# अखेरचा हा तुम्हा दंडवत!

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशिम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर(ठाणे), नाशिक, चंद्रपूर महासागर

महासागर

Epaper:www.epaper.dainikmahasagar.in ● nagpurpost@gmail.com●mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २०७ * * अमरावती * शुक्रवार, दिनांक ३० जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

आतील पानात
२ रहस्य उलगडणार...
४ विलीनीकरण की...
५ अश्रूचित्रे...



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर / मुंबई, दि. २९ :

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या पार्थिवावर आज गुरूवारी शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे पुत्र जय आणि पार्थ यांनी दादांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. अजित पवार यांच्या अंत्यसंस्काराला बारामतीसह संपूर्ण पुणे जिल्हा तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून प्रचंड जनसागर उमडला होता. जमलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यातून अश्रू आणि दादांविषयींचे प्रेम ओसंडून वाहत होते.

## शरदराव... नातवांना आशीर्वाद द्या !

आग्रह लेख खरीखरी.. श्रीकृष्ण चांडक



काल महाराष्ट्राचे महाव्यापी नेते शरदचंद्रजी पवार यांच्यावर आपल्या पुतण्याच्या म्हणजेच अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे वज्राघात झाला आहे. आपल्या डोळ्यासमोर पुढच्या पिढीचे जाणे किती वेदनादायी असू शकते आणि ते केवळ कल्पनेतही किती दुःखदायी वाटते, हे आम्ही सांगायची गरज नाही. आता पुढे काय, हा निर्णय प्रत्यक्ष शरदचंद्र पवार साहेबांनाच घ्यावयाचा आहे. पुतण्याने त्यांच्या हाताखाली अनेक वर्ष त्यांच्या आज्ञांचे पालन केले. शेवटी एका विशिष्ट टप्प्यावर अजित दादांना वेगळा निर्णय घ्यावा लागला. त्यांच्या राजकारणासाठी तो निर्णय घेणे त्यांच्या मते गरजेचेच होते. पण त्यावर चर्चा करण्याऐवजी पवार कुटुंबाच्या ऐक्यासाठी पाऊल उचलण्याची आणि कुटुंबाला एका सूत्रात गुंफण्याची जबाबदारी आता त्यांच्यावर आलेली आहे. राजकारण हे राजकारणाच्या ठिकाणी असते त्यामुळेच आता जे काही मतभेद असतील ते अजित दादांच्या चितेबरोबर स्वाहा झाले पाहिजेत. मध्यंतरीच्या काळात अनेकदा दोन्ही राष्ट्रवादीचे ऐक्य झाले पाहिजे अशा बातम्या वारंवार वृत्तपत्रांमधून येत होत्या. आता पवार कुटुंबावरील दुःखाच्या डोंगराला झेलण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादीचे ऐक्य होणे ही काळाची गरज आहे. कुटुंबप्रमुख म्हणून आता शरदजींनी साहेब न राहता आबा बनून राहावे हेच या शोकाच्या घडीत गरजेचे झालेले आहे. दुर्दैवाने त्यांच्यानंतरच्या दुसऱ्या पिढीचे राजकारण काळाने अकस्मात थांबवले आहे. आता पवार कुटुंबात भावनिक ऐक्य आपोआपच निर्माण झाले आहे. हे ऐक्य टिकवण्याची संपूर्ण जबाबदारी शरदचंद्र गोविंदराव पवार यांची आहे. या भीष्म पितामह आजोबांना ती पेलावी लागेल. सत्ता असो अथवा नसो अनेक दशके महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार हे नाव केंद्रस्थानी होते आणि आहे. या घडीला पक्षातील अनेक नेत्यांनी दादांच्या अर्धांगिनी खा. सुनेत्रा पवार यांच्याकडे नेतृत्व सोपविण्याचे आवाहन केले आहे, याचाही विचार होऊ शकतो. पण सुनेत्रा पवार यांनी सुप्रियाताई बरोबर काही दिवस दिल्लीचे राजकारण बघितले तरी चालेल. हे शक्य नसेल तर, मोठ्या मनाने खंबीरपणे निर्णय घेऊन संयुक्त पक्षाची धुरा रोहित पवार आणि पार्थ पवार यांच्याकडे सोपविली पाहिजे. पक्षातील काही ज्येष्ठ नेत्यांचा त्यामुळे थोडाबहुत रोष होण्याचा संभव आहे. परंतु हा धोका पत्करूनही सद्यस्थितीत दादांच्या प्रेमाखातर पक्ष या पिढीला आज तरी स्वीकारण्याच्या मनस्थितीत असेल, याबद्दल आमच्या मनात शंका नाही. सुप्रिया ताईना दिल्ली आंदणात द्यावी आणि महाराष्ट्राचे घर सांभाळायची जबाबदारी पक्षातील ज्येष्ठ नेत्यांच्या सहकार्याने या दोन तरुणांनी आपले मतभेद विसरून सांभाळावी हेच आता अत्यावश्यक झालेली आहे. दादांच्या निधनानंतर येत्या १५ दिवसात दोन्ही गटांच्या ऐक्याची घोषणा झाली पाहिजे. या नव्या नेतृत्वाला काम करण्यासाठी मुभा मिळाली पाहिजे. आपण फक्त बारामतीच्या विकासाचा नव्हे तर महाराष्ट्राच्या नेतृत्वाचा पाया रचला. पवार कुटुंबातील अजित दादांनी तो जोपासला आणि आता तिसऱ्या तरुण पिढीला महाराष्ट्राने स्वीकारावे यासाठी आपला अफाट अनुभव त्यांच्या पाठीमागे उभा करावा. आपण आता सक्रिय राजकारणातून बाजूला होऊन मोठे मन दाखवावे. राज्याच्या हितासाठी तसेच पक्षाच्या उन्नतीसाठी हे अवश्यंभावी आहे. आपल्या आशीर्वादामुळे पक्षाला आणि पवार कुटुंबाला आता पुन्हा नवसंजीवनी देण्यासाठी आपली निवृत्ती अतिशय महत्त्वाची ठरेल. आपण राजकारणातील हिमालय आहात संपूर्ण राष्ट्र आपल्याकडे त्याच नजरेतून पाहते. पण दादांच्या जाण्याने हा हिमालयही हादरला आहे असे आमचे निरीक्षण आहे. पवार कुटुंबात जी पोकळी निर्माण झाली आहे ती भरून काढण्याचे सामर्थ्य केवळ तुमच्यातच आहे. तुमच्या छत्रछायेत नव्या पिढीला बहरू द्या, हाच तुमच्या कडून अजित दादांना मिळालेला आशीर्वाद ठरेल. तुम्ही पवार कुटुंबाच्या ऐक्याचे आधारस्तंभ आहात हा स्तंभ तसाच कायम राहील यात शंकाच नाही. पण आता तुम्ही तुमच्या नातवांना आशीर्वाद देण्याचा निर्णय घेतला पाहिजे, हे आमचे नम्र आवाहन आहे.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# अजितदादांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री फडणवीस, नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांची श्रद्धांजली

### अश्रू आवरणे जनसागराला कठीण

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शोकाकुल वातावरणात शासकीय इतमामात अखेरचा निरोप देण्यात आला.

बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली.



यावेळी विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रताप जाधव, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ, डॉ. नीलम गोऱ्हे, राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, छगन भुजबळ, चंद्रकांतदादा पाटील, हसन मुश्रीफ, गणेश नाईक, बाबासाहेब पाटील, मकरंद पाटील, दत्तात्रय भरणे, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, मंगलप्रभात लोढा, मृद व संजय राठोड, आदिती तटकरे, शंभूराज देसाई, जयकुमार गोरे, शिवेंद्रसिंह भोसले, प्रा. डॉ. अशोक वुईके, नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मेघना साकोरे-बोर्डीकर, आकाश फुंडकर उपस्थित होते.

प्रशासनाच्या वतीने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राज्यभरातील खासदार, आमदार, वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बारामतीच्या मातीत 'दादा' विसावले!



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

ज्या बारामतीने अजित पवारांना ताकद दिली, त्याच बारामतीच्या मातीत आज एका झंझावाताचा अंत झाला. सकाळपासूनच बारामतीकडे जाणारे सर्व रस्ते जनसागराने ओसंडून वाहत होते. आपल्या लाडक्या नेत्याचे दर्शन घेण्यासाठी प्रत्येक डोळा पाणावलेला होता आणि आसवांनी भिजलेली बारामती आज पूर्णपणे सुन्न झाली होती.

एरव्ही राजकीय मैदानात एकमेकांवर तुटून पडणारे नेते आज एकाच व्यासपीठावर दुःखात बुडालेले दिसले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी केंद्र सरकारतर्फे आदरांजली वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पार्थिवाला खांदा देताना आपले अश्रू रोखू शकले नाहीत.

शरद पवार साहेब आणि सुप्रिया सुळे यांनी संपूर्ण पवार कुटुंबाचे सांत्वन केले. राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांनीही अंत्यविधीला उपस्थित राहून 'दादा' हे महाराष्ट्राचे कसे होते, हेच अधोरेखित केले.

दुपारी साडेबाराच्या सुमारास पोलिसांनी हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून पूर्ण शासकीय इतमामात मानवंदना दिली. बिगुल वाजला आणि आसमंत अजित दादा अमर रहे....च्या घोषणांनी भरून गेला. पार्थ आणि जय पवार यांनी जेव्हा मुखाग्नी दिला, तेव्हा उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांचा संयम सुटला आणि एकच टाहो फोडला गेला.

आज केवळ एक राजकीय नेता गेला नाही, तर सामान्य माणसाचा, कार्यकर्त्याचा आणि अधिकाऱ्यांचा हक्काचा आधारस्तंभ कोसळला आहे. मंत्रालयात सकाळी सहा वाजता कामाला लागणारा 'अजितपर्वा'चा योद्धा आता अनंतात विलीन झाला आहे.

## युजीसीच्या नवीन नियमांना सुप्रीम कोर्टाची स्थगिती

### नव्याने मसुदा तयार करण्याचे केंद्राला निर्देश

■ वृत्तसंस्था नवी दिल्ली, दि. २९ :

सुप्रीम कोर्टानं विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) नवीन नियमांवर पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या यांच्या खंडपीठाने म्हटले की, यातील तरतुदी अस्पष्ट आहेत आणि त्यांचा गैरवापर होऊ शकतो.


सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारला नियमांचा मसुदा पुन्हा तयार करण्याचे निर्देश दिले. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी केंद्राला विचारले की, आम्ही जातीविहीन समाजाच्या दिशेने किती प्रगती केली आहे. आता आपण उलट्या दिशेने जात आहोत का? कोर्टाने म्हटले, पीडितांना न्यायापासून वंचित ठेवता येणार नाही. आम्हाला सामान्य प्रवर्गाच्या तक्रारींशी काही देणेघेणे नाही. आमची चिंता ही आहे की, आरक्षित समुदायांसाठी निवारण प्रणाली लागू राहिली पाहिजे.

दरम्यान, देशभरात सवर्ण जातीचे विद्यार्थी आणि सामान्य नागरिक युनिव्हर्सिटी ग्रांट्स कमिशन (युजीसी) च्या नवीन नियमांना विरोध करत आहेत. गुरुवारी दिल्ली विद्यापीठाच्या नॉर्थ कॅम्पसबाहेर विद्यार्थ्यांनी निदर्शने केली.

उत्तर प्रदेशातील लखनऊ विद्यापीठाच्या न्यू कॅम्पसमध्ये विविध विद्यार्थी संघटनांशी संबंधित विद्यार्थी घोषणाबाजी करत रस्त्यावर बसले. विद्यार्थ्यांचा गोंधळ सुरूच आहे. घटनास्थळी मोठ्या संख्येने पोलीस दल तैनात आहे. कानपूरमध्ये भरत शुक्ला नावाच्या एका व्यक्तीने युजीसीच्या विरोधात डोके मुंडवून अनोखे आंदोलन केले.

## लोकसभेत आर्थिक सर्वेक्षण सादर

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २९ :



आमच्या सरकारचे वैशिष्ट्य म्हणजे सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तन हे आहे. आता आपण सुधारणांच्या दिशेने वाटचाल करत आहोत, असे पंतप्रधान मोदी यांनी आज सांगितले ते पुढे म्हणाले, हे सत्र अत्यंत महत्त्वाचे आहे. २१ व्या शतकाचा एक चतुर्थांश भाग उलटून गेला आहे. ही दुसऱ्या तिमाहीची सुरुवात आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी ही २५ वर्षे महत्त्वाची आहेत.

लोकसभेत नऊ विधेयके प्रलंबित आहेत, ज्यात डेव्हलप्ड इंडिया एज्युकेशन फाउंडेशन विधेयक २०२५, सिक्युरिटीज मार्केट्स कोड २०२५ आणि संविधान (१२९ वी सुधारणा) विधेयक २०२४ यांचा समावेश आहे. ही विधेयके सध्या संसदीय स्थायी किंवा निवड समित्यांद्वारे तपासली जात आहेत.



# बारामती विमान दुर्घटनेचे रहस्य उलगडणार

■ वृत्तसंस्था, बारामती, दि. २९ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या लिअरजेट 45 विमान अपघाताच्या तपासाला वेग आला असून, दुर्घटनेनंतर विमानाचा ब्लॅक बॉक्स शोधून काढण्यात तपास यंत्रणांना यश आले आहे. बुधवारी सायंकाळी साडेसहा वाजता एअरपोर्ट अथॉरिटी, पोलिस फॉरेन्सिक पथक, DGCA आणि एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो यांच्या विशेष टीमने घटनास्थळी दाखल होत तांत्रिक तपास सुरू केला. फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर असलेला ब्लॅक बॉक्स ताब्यात घेण्यात आला असून, त्यातून अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हा भीषण अपघात बुधवारी सकाळी सुमारे 8.45 वाजता घडला. दिल्लीस्थित व्हीसीआर व्हेंचर्स कंपनीद्वारे चालवले जाणारे लिअरजेट 45 विमान बारामती



विमानतळावर उतरण्याचा दुसरा प्रयत्न करत असताना धावपट्टीच्या बऱ्याच आधी कोसळले.

या दुर्घटनेत 66 वर्षीय अजित पवार, त्यांचे वैयक्तिक सुरक्षा अधिकारी, एक सहाय्यक तसेच कॉकपिटमधील दोन्ही वैमानिक कॅप्टन सुमित कपूर आणि फर्स्ट ऑफिसर शांभवी पाठक यांचा जागीच मृत्यू झाला. अजित पवार मुंबईहून सकाळी 8 वाजता निघाले होते आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बारामतीत चार प्रचार सभांना संबोधित करण्याचा त्यांचा कार्यक्रम होता.

नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने जाहीर केलेल्या अधिकृत माहितीनुसार, विमानाने सकाळी 8.18 वाजता बारामती विमानतळाशी संपर्क साधला होता. त्या वेळी वैमानिकांना हवामानाची माहिती

## अजित पवारांच्या लिअरजेटचा ब्लॅक बॉक्स हस्तगत

देण्यात आली आणि लँडिंग पायलटच्या निर्णयावर करण्याचा सल्ला देण्यात आला. वैमानिकांनी वाऱ्याची दिशा आणि दृश्यमानतेबाबत विचारणा केली असता, दृश्यमानता सुमारे 3,000 मीटर असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर विमानाने रनवे 11 वर अंतिम उतरणीची माहिती दिली, मात्र काही क्षणांतच धावपट्टी दिसत नसल्याचे सांगत गो-अराउंड करण्याचा निर्णय घेतला.

पहिल्या प्रयत्नानंतर विमानाने पुन्हा अंतिम उतरणीचा प्रयत्न केला. एटीसीकडून धावपट्टी दिसत असल्याची खात्री विचारण्यात आली आणि ती मिळाल्यानंतर सकाळी 8.43 वाजता लँडिंगची परवानगी देण्यात आली. मात्र, याच टप्प्यावर एक गंभीर त्रुटी समोर आली. लँडिंग क्लीअरन्स मिळाल्यानंतर वैमानिकांकडून आवश्यक असलेला रीडबॅकम्हणजे परवानगी समजल्याची पुनःपुष्टी देण्यात आली नाही. पुढच्याच मिनिटाला, 8.44 वाजता, एटीसीने रनवे 11 च्या थ्रेशहोल्डजवळ आगीच्या ज्वाळा पाहिल्याचे मंत्रालयाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डरमध्ये वैमानिकांचे शेवटचे शब्द ओह शिट असे ऐकू आल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे बारामती विमानतळावरील ग्राउंड कंट्रोल हे शहरातील दोन खासगी विमान प्रशिक्षण संस्थांमधील रेडबर्ड एव्हिएशन आणि कार्व्हर एव्हिएशन पायलट कॅडेट्सकडून सांभाळले जाते. हाच या उड्डाणाचा जमिनीवरील संपर्क बिंदू होता. कॅप्टन सुमित कपूर यांचा 15 हजार तासांपेक्षा अधिक उड्डाणाचा अनुभव होता, तर सहवैमानिक शांभवी पाठक यांनी सुमारे 1,500 तासांचे उड्डाण केले होते.

# फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांच्यावर अंत्यसंस्कार



■ वृत्तसंस्था, बारामती, दि. २९ :

बारामती येथे अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघातात मृत्यू झालेल्या फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांच्यावर आज, २९ जानेवारी २०२६ रोजी मुंबईतील वरळी येथील त्यांच्या निवासस्थानी अंत्यसंस्कार करण्यात आले.

पिंकी माळी यांच्या निधनाने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पिंकी माळी यांना अखेरचा निरोप देताना त्यांचे कुटुंबीय आणि मित्रपरिवार अत्यंत भावूक झाले होते. समाजातील सर्वच स्तरांतून या घटनेबद्दल शोक व्यक्त केला जात असून, कुटुंबाने अत्यंत सन्मानपूर्वक पद्धतीने हा अंत्यविधी पार पाडला. प्रभादेवीच्या सेंच्युरी बाजाराजवळील हसू तांडेल मार्ग, सेंच्युरी मिल म्हाडा कॉलनी येथे पिंकी यांचे कुटुंब वास्तव्यास आहे.

पिंकी यांचे वडील शिवकुमार माळी हे राष्ट्रवादी काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते असून त्यांनी टॅक्सी चालवून मोठ्या जिद्दीने कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. प्रतिकूल परिस्थितीत शिवकुमार माळी यांनी पिंकीला शिक्षण दिले. इयत्ता १२ वीपर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी फ्लाईट अटेंडंटचे प्रशिक्षण घेतले. १२ वीनंतर फ्लाईट अटेंडंटचे प्रशिक्षण पूर्ण करून गेल्या पाच वर्षांपासून त्या व्हीसीआर व्हेंचर्स कंपनीत कार्यरत होत्या.

# दादांनी मला आमदार केले

■ वृत्तसंस्था, बारामती, दि. २९ :

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी आज अजित पवारांच्या आठवणीत चांगलेच भावूक झाले. मी भाड्याच्या घरात राहत होतो. माझ्याकडे एकही कागद नव्हता. दादांनी स्वतः वकील लावून माझे कागदपत्र तयार केले. मला आमदार केले. त्यानंतर मी दादांची देवगिरी बंगल्यावरून चप्पल चोरून आणली. त्या चप्पलेची मी माझ्या घराच्या वास्तूशांतीला पूजा केली, असे त्यांनी आज रडत - रडत सांगितले.

अजित पवारांचे बुधवारी विमान अपघातात अकाली निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात शासकीय इतमामात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी, आमदार अमोल मिटकरी यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना चांगलेच भावूक झाले. ते म्हणाले, अजित पवारांनी भाजपशी युती असतानाही शिव- शाहू - फुले - आंबेडकरांचा विचार सोडला नाही. त्यामुळेच आम्ही त्यांच्यावर जीव ओवाळून टाकणारी माणसे आहोत. दादा इतका मोठा व्यक्ती होता की, ते काल कसे चुकले हेच समजत नाही. ते गाडीत बसतानाही सिट बेल्ट ओके आहे का? ड्रायव्हर ओके आहे का? असे दोनदा चेक करायचे.



काल एवढे मोठे विमान घेऊन येत असताना विमान घिरट्या खातंय असे त्यांना का वाटले नाही? दादांची अशी एक्झिट झाली यावर माझा विश्वासच बसत नाही. शिव, शाहू, फुले, आंबेडकर, यशवंतराव चव्हाण आम्ही डोळ्यांनी पाहिले नाही. पवार साहेब व दादांच्या रुपात आम्ही ते पाहिले. पण आता दादाच गेल्यामुळे सर्वकाही संपले आहे. पवार साहेबांचा मुलगा गेला. आशाताईंच्या पोटचा गोळा गेला, असे ते म्हणाले.

अमोल मिटकरींनी यावेळी अजित पवारांनी आपल्याला कसे उभे केले याचा किस्साही सांगितला. ते म्हणाले, मी भाड्याच्या घरात राहणारा माणूस होतो. 6 वर्षांपूर्वी मला अचानक दादांचा फोन आला. मी तुला आमदार करणार आहे. तू तुझे कागदपत्र घेऊन ये असे ते म्हणाले. त्यावर मी म्हणालो, दादा माझ्याकडे कुठलाच कागद नाही. इन्कम टॅक्स भरायचा माझा संबंधच नव्हता. त्यानंतर दादांनी स्वतः वकील लावून माझ्या कागदपत्रांची पूर्तता करून घेतली. त्याच्यानंतर माझे घर झाले.

# शहीद विदीप जाधव यांना अखेरचा निरोप

■ वृत्तसंस्था, बारामती, दि. २९ :



बारामती येथील दुःखद चार्टर विमान अपघाताने महाराष्ट्राला खोल शोकात बुडाले आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे वैयक्तिक सुरक्षा अधिकारी (पीएसओ) विदीप दिलीप जाधव यांचेही या अपघातात अकाली निधन झाले. विदीप जाधव यांचे अंतिम संस्कार बुधवारी रात्री उशिरा सातारा जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावी पूर्ण राजकीय सन्मानाने आणि भावपूर्ण वातावरणात करण्यात आले. त्यांच्या धाकट्या मुलाने चितेला अग्नी दिला.

बारामती येथे अपघात झालेल्या दुर्दैवी चार्टर विमानातील विदीप जाधव प्रवासी होते. क्रू मेंबर पिंकी माळी आणि दोन वैमानिकांसह विमानातील सर्व पाच जणांना आपला जीव गमवावा लागला. या दुर्घटनेने केवळ राजकीय जगतालाच नव्हे तर पोलिस विभागालाही मोठा धक्का बसला आहे. मुंबई पोलिसात कार्यरत असलेले विदीप जाधव हे २००९ च्या बॅचचे शिस्तबद्ध पोलिस कॉन्स्टेबल होते. मूळचे सातारा जिल्ह्यातील लोणंद गावचे रहिवासी असलेले जाधव सध्या त्यांच्या कर्तव्यामुळे मुंबईतील कळवा परिसरात त्यांच्या कुटुंबासह राहत होते. तो एक शांत, कर्तव्यदक्ष आणि जबाबदार अधिकारी म्हणून ओळखला जात असे जो नेहमीच आपल्या कर्तव्याला प्राधान्य देत असे. अपघाताची बातमी मिळताच कुटुंबाला मोठा धक्का बसला. अपघाताच्या दिवशी सकाळी विदीप जाधव नेहमीप्रमाणे ड्युटीवर जाताना शेजाऱ्यांनी पाहिले. विमान अपघाताची बातमी टेलिव्हिजनवर येताच त्याची आई बेशुद्ध पडली. कळवा पोलिसांनी कुटुंबाला कळवले आणि त्यांना बारामतीला नेण्यात आले.

विदीप जाधवच्या कुटुंबात त्याची पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आणि त्याचे पालक आहेत. त्यावेळी त्याची पत्नी पनवेल येथील तिच्या आईवडिलांच्या घरी होती. बातमी मिळताच कुटुंबातील सर्व सदस्य हादरून गेले. अंत्यसंस्काराच्या वेळी गाव दुःखाने भरले होते, प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू होते. शेजारी आणि सहकाऱ्यांच्या मते, विदीप जाधव अत्यंत मैत्रीपूर्ण आणि मदतगार होते. पोलिस दलात सेवा करत असतानाही ते नेहमीच सामान्य लोकांना मदत करण्यात आघाडीवर असत.

# मोदी-फडणवीसांनी अजित पवारांवरील आरोप मागे घ्यावे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी विमान अपघातातील निधनानंतर देशभरातून शोक व्यक्त केला जात असतानाच, भाजपकडून देण्यात आलेल्या पानभर श्रद्धांजली जाहिरातींवरून नवा राजकीय वाद उफाळून आला आहे. उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका करत, जाहिराती देणे ही श्रद्धांजली नाही, तर अजित पवारांवर लावलेले 70 हजार कोटींचे आरोप मागे घेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असा थेट हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही राऊत यांनी यावेळी स्पष्ट सल्ला दिला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात शोककळा पसरली असली, तरी त्याचवेळी आरोप-प्रत्यारोपांचाही नवा अध्याय सुरू झाला आहे. भारतीय जनता पक्षाने अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी विविध वर्तमानपत्रांमध्ये पानभर जाहिराती प्रसिद्ध केल्या. या जाहिरातींमधून अजित पवार यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. मात्र, या



जाहिरातींवरूनच आता राजकीय टीकेची धार अधिक तीव्र होताना दिसत आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी या जाहिरातींवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत भाजपच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला आहे.

दादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी पानभर जाहिराती दिल्या. पण त्याने काय होणार? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यांच्या मते, केवळ जाहिराती देऊन सहानुभूती दाखवणे हा श्रद्धांजलीचा खरा अर्थ नाही. अजित पवार यांच्या जिवंतपणी त्यांच्यावर गंभीर आर्थिक आरोप करणा?यांनी आता अचानक श्रद्धांजली देणे हे राजकीय दुटप्पीपणाचे लक्षण असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

राऊत यांनी आपल्या टीकेत प्रामुख्याने 70 हजार कोटींच्या कथित आरोपांचा मुद्दा उपस्थित केला. भाजप नेते, विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्यावर यापूर्वी 70 हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले होते, हे संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे, असे राऊत म्हणाले. हे आरोप आजही अधिकृतरीत्या मागे घेण्यात आलेले नाहीत. अशा परिस्थितीत, त्याच नेत्यांनी अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांना थोर नेते म्हणून गौरवणे, हे केवळ राजकीय सोयीचे असल्याची टीका त्यांनी केली. जर खरोखरच अजित पवार यांना श्रद्धांजली द्यायची असेल, तर पानभर जाहिराती देण्याऐवजी त्यांच्यावर लावलेले सर्व आरोप अधिकृतपणे मागे घ्या, असा स्पष्ट सल्ला संजय राऊत यांनी मोदी आणि फडणवीसांना दिला. आरोप मागे घेणे म्हणजे अजित पवार यांच्या प्रतिमेवरील डाग पुसण्यासारखे ठरेल.

# जिल्हा परिषदेचे १६ कर्मचारी निलंबित

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. २९ :

जळगाव जिल्हा परिषदेत दिव्यांग प्रमाणपत्राच्या टक्केवारीत मोठी तफावत आढळून आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात आतापर्यंत जिल्हा परिषदेच्या विविध विभागांतील 16 कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून, पुढील टप्प्यात खात्यांतर्गत चौकशी करून थेट बडतर्फी अथवा अन्य कठोर शिक्षात्मक कारवाई केली जाईल, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या वतीने दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे नोकरीत असलेल्या कर्मचाऱ्यांची सखोल तपासणी सुरू करण्यात आली आहे. या तपासणीत काही कर्मचाऱ्यांनी 40 टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याचे प्रमाणपत्र सादर करून शासकीय नोकरीचा लाभ घेतल्याचे समोर आले. मात्र तक्रार प्राप्त झालेल्या कर्मचाऱ्यांची वैद्यकीय पुर्नतपासणी केल्यानंतर प्रत्यक्षात त्यांचे दिव्यांगत्व केवळ 3 ते 4 टक्के असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेष बाब म्हणजे, काही प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्यांकडे वैध दिव्यांग प्रमाणपत्रच नसताना त्यांना दिव्यांग कोट्यातील लाभ देण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अशा प्रकरणांत संबंधित कर्मचाऱ्यांबरोबरच त्यांना लाभ मंजूर करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात येणार असल्याचे सीईओ मीनल करणवाल यांनी स्पष्ट केले आहे.

# आमच्या अजितदादांना नेऊ नका

## काटेवाडीत कार्यकर्त्यांनी रोखली रुग्णवाहिका



■ वृत्तसंस्था, बारामती, दि. २९ :

"आमचा दादा आम्हाला पोरका करून गेला... आमचा देवच गेला!" अशा शब्दांत काटेवाडीतील महिलांनी फोडलेला टाहो आणि समर्थकांच्या डोळ्यांतील अश्रूंचा पूर, अशा अत्यंत हृदयद्रावक वातावरणात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्काराची प्रक्रिया सुरू आहे. बुधवारी झालेल्या भीषण विमान अपघातानंतर आज सकाळी त्यांचे पार्थिव बारामतीहून त्यांच्या मूळ गावी, काटेवाडीत आणण्यात आले, तेव्हा संपूर्ण परिसर शोकसागरात बुडाला होता.

आमचा दादा महाराष्ट्राचा वाघ होता... ओ साहेब, थांबा ना, आमच्या दादांना असे नेऊ नका, तुमच्या पाया पडतो! हे काळीज पिळवटून टाकणारे शब्द होते काटेवाडीतील त्या कार्यकर्त्यांचे, जे आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देताना अक्षरशः रुग्णवाहिकेसमोर आडवे होत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पार्थिव जेव्हा काटेवाडीतील निवासस्थानावरून विद्या प्रतिष्ठानकडे नेण्यासाठी रुग्णवाहिकेत ठेवण्यात आले, तेव्हा उपस्थित जनसागराचा संयमाचा बांध फुटला.

अजित पवार यांचे पार्थिव सकाळी बारामती वैद्यकीय महाविद्यालयातून त्यांच्या काटेवाडीतील निवासस्थानी आणण्यात आले. दादांना आपल्या गावच्या मातीची आणि इथल्या माणसांची प्रचंड ओढ होती; सण-उत्सव ते नेहमी इथेच साजरे करायचे. त्यामुळेच, आज जेव्हा त्यांचे पार्थिव घराबाहेर आले, तेव्हा लाडक्या नेत्याला शेवटचे पाहण्यासाठी नागरिकांनी अलोट गर्दी केली.

# 'शिंदेंना आत घेऊन या' म्हणणारे दादाच उरले नाहीत : आनंद शिंदे

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २९ :

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अंत्यदर्शनासाठी राजकीय क्षेत्रासोबतच कला क्षेत्रातील दिग्गजांनीही मोठी गर्दी केली होती. प्रसिद्ध गायक आनंद शिंदे हेदेखील आपल्या लाडक्या नेत्याला शेवटचा निरोप देण्यासाठी पोहोचले होते, मात्र गर्दीमुळे त्यांना आत प्रवेश मिळू शकला नाही. यावेळी आपली खंत व्यक्त करताना ते अत्यंत भावुक झाले. ज्या दादांसोबत मी अनेक वर्षे उठलो-बसलो, आज त्यांच्याच दर्शनासाठी आत जाता आले नाही. आता फोन करताच 'शिंदेंना आत घेऊन या' असे हक्काने सांगणारा माणूसच राहिला नाही, अशा शब्दांत त्यांनी आपले



दुःख मांडले. एका जवळच्या मित्राला आणि खंबीर पाठीराख्याला गमावल्याची भावना व्यक्त करत त्यांनी हात जोडून तिथून निघणे पसंत केले.

यावेळी बोलताना आनंद शिंदे म्हणाले, आता काहीच सुचत नाही. आत इतकी गर्दी आहे की मी सुद्धा आतमध्ये जाऊ शकलो नाही. ही खेदाची गोष्ट आहे की मी इथपर्यंत येऊन त्यांचे दर्शन घेऊ शकलो नाही. ज्या दादांसोबत मी बसलो उठलो, कोणाचे काही काम असले की मी थेट दादांना फोन करायचो. मग दादा सांगायचे शिंदेंना घेऊन या. पण आता दादाच तिथे आहेत मग मला कोण फोन करून बोलावून घेणार. दादांना शेवटचे भेटता येत नसल्याने आनंद शिंदे भावुक झाले होते. तसेच त्यांनी तिथून निघून जाणे पसंत केले.

दरम्यान, अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून, अत्यंत जड अंतःकरणाने त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. धडाडीचे नेतृत्व आणि विकासकामांचा झपाटा लावणारा एक कणखर नेता हरपल्याची भावना जनसामान्यांमध्ये आहे. आता पुन्हा कधीही सभेच्या व्यासपीठावर किंवा पत्रकार परिषदेत दादांचा तो रोखठोक आणि मिश्किल आवाज ऐकू येणार नाही.

# भरधाव ट्रकच्या धडकेत मजुराचा मृत्यू

■ वृत्तसंस्था, गंगापूर, दि. २९ :

ट्रकने बैलगाडीला दिलेल्या धडकेत ऊसतोड मजूर ठार झाल्याची दुर्दैवी घटना इसारवाडी फाटा ते बिडकीन रोडवर बुधवारी (दि. २८) पहाटे तीन वाजेच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, राजू उत्तम ठेंपे (४०, रा. खामखेडा, ता. फुलंब्री) हे त्यांच्या कुटुंबासह मुक्तेश्वर साखर कारखान्यामध्ये ऊसतोड मजुरी करीत होते. नेहमीप्रमाणे पहाटे तीन वाजेच्या सुमारास कारखान्यासमोरून त्यांच्या मुलासोबत ऊसतोडीसाठी जात असताना इसारवाडीकडून बिडकीनकडे जाणाऱ्या ट्रकने बैलगाडीला पाठीमागून जोराची धडक दिली.

या धडकेमुळे राजू ढेपे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचा मुलगा सोपान हा बैलगाडीसह रोडच्या कडेला फेकला गेल्याने जखमी झाला.

# व्यापारी पेठेतील दुकाने बंद

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २९ :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी सकाळी बारामती परिसरात विमान अपघातात मृत्यू झाल्यानंतर शहरातील सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आले. शहरातील व्यापारी पेठा, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डमधील घाऊक फळभाजी, भुसार बाजार बंद ठेवण्यात आला. लक्ष्मी रस्त्यासह महात्मा फुले मंडई, तसेच उपनगरातील बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्याने गुरुवारी शहरात शुकशुकाट पाहायला मिळाला.

अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शहरातील सर्व व्यापारी दुकाने सकाळपासून बंद ठेवण्यात आली होती. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डाच्या आवारातील फळभाजी बाजार, भूसार बाजार, तसेच मांजरी, मोशी, खडकी, उत्तमनगर येथील उपबाजार बंद ठेवण्यात आला.




मुख्य बाजारासह उपबाजारात गुरुवारी शेतकऱ्यांनी शेतमाल विक्रीस पाठविला नाही. लक्ष्मी रस्ता, महात्मा फुले मंडई, तुळशीबाग, कुमठेकर रस्ता, बाजीराव रस्ता, टिळक रस्ता, रविवार पेठेतील बोहरी आळी परिसरातील दुकाने बंद ठेवण्यात आली होती. भवानी पेठेतील भूसार बाजार, टिंबर मार्केट परिसरातील व्यवहार बंद ठेवण्यात आले होते.

पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी विविध संस्था, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून फलक लावण्यात आले होते. एरवी दररोज सकाळी शहातील प्रमुख रस्त्यांवर गर्दी असते. गुरुवारी शहरातील सर्व व्यवहार बंद ठेवण्यात आल्याने शुकशुकाट पाहायला मिळाला.

# दाभड येथे वृद्ध महिलेचा खून

■ वृत्तसंस्था, नांदेड, दि. २९ :

नांदेड जिल्ह्यातील अधार्पूर तालुक्यातील दाभड येथे बुधवारी एका वृद्ध महिलेची डोक्यात दगड घालून निर्घृण हत्या करण्यात आली. पार्वतीबाई सूर्यवंशी असे मृत महिलेचे नाव आहे. शेतात जाताना त्यांचा खून करण्यात आला. दाभड येथील रहिवासी पार्वतीबाई सूर्यवंशी (75) 28 जानेवारी रोजी सकाळी शेताकडे जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्यानंतर सायंकाळी उशिरापर्यंत त्या घरी पोहोचल्या नाही. त्यानंतर कुटुंबीयांनी शेतात जाऊन पाहणी केली असता त्या शेतातही दिसल्या नाही. त्यामुळे नातेवाईकांनी त्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांचा मृतदेह दाभड शिवारातील एका विहिरीजवळ आढळला.

## प्रजासत्ताक दिन संचलनात

# महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट

■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २९ :

देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे सादरीकरण सर्वोत्कृष्ट ठरले आहे. यंदाच्या संचलनामध्ये राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारकडून या निकालांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, या गटात जम्मू-काश्मीर आणि केरळ या राज्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे.

यंदा महाराष्ट्राने 'गणेशोत्सवः आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता. या चित्ररथाच्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून




मिळणारा आर्थिक रोजगार व आत्मनिर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. चित्ररथावरील भव्य गणेशमूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या उत्साहाने कर्तव्यपथ दुमदुमून गेला होता. याच प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गटातून महाराष्ट्राच्या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथ म्हणून निवडले आहे.

केवळ राज्यांच्या श्रेणीतच नव्हे, तर इतर विभागांतही चुरस पाहायला मिळाली.

यामध्ये सेना दलातून 'भारतीय नौदल' तर निमलष्करी दलातून 'दिल्ली पोलीस' यांच्या संचलन पथकाला सर्वोत्कृष्ट म्हणून गौरवण्यात आले. केंद्रीय मंत्रालयांच्या गटामध्ये सांस्कृतिक मंत्रालयाच्या चित्ररथाने बाजी मारली, तर केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि 'वंदे मातरम' नृत्य समूहाला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# मृतक चौघांपैकी दोघे राजस्थानचे

## बुधवारी रात्री उशिरा सायतजवळ दोन कार झाला होता अपघात









**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.29 )** – भातकुली तालुक्यातील सायत गावाजवळ बुधवारी (दि. 28) रात्री सुमारे 10 वाजताच्या सुमारास हुंडाई आयङ्क20 आणि होंडा सिटी या दोन कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन चार जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. सुरुवातीला मृतांची ओळख पटू शकली नव्हती. मात्र उशिरा रात्री मृतांची ओळख निष्पन्न झाली असून त्यापैकी दोघे अमरावती व बडनेरा येथील, तर उर्वरित दोघे मूळचे राजस्थानचे असल्याची माहिती समोर आली आहे. हे दोघे सध्या भातकुली येथे मुक्कामी होते.


या अपघातात गोपालसिंह राजपुरोहित (वय 30, रा. भातकुली, मूळ रा. राजस्थान), प्रेम उर्फ प्रकाश किशनराव बिश्नोई (वय 32, रा. भातकुली, मूळ रा. राजस्थान), मुकुंद एकनाथ काले (वय 57, रा. चैतन्य कॉलनी, यशोदा नगरङ्कदस्तुर नगर रोड, अमरावती) आणि जुनेद खान मजीद खान (वय 35, रा. जुनी बस्ती, बडनेरा) यांचा जागीच मृत्यू झाला.

धडक इतकी भीषण होती की दोन्ही वाहनांचे अक्षरशः तुकडे झाले. अपघातात एक व्यक्ती गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारांसाठी त्याला खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुकुंद काले व त्यांचे चालक जुनेद खान हे होंडा सिटी (एमएच 27/बीई 0103) या कारने दर्यापूरहून अमरावतीकडे येत होते. मुकुंद काले हे साईनगर परिसरातील 'कृष्णार्पण' नावाच्या गॅरेजचे संचालक होते. तर हुंडाई आयङ्क20 कारमधील प्रेम बिश्नोई व गोपालसिंह राजपुरोहित हे भातकुली येथील 'बिकानेर मिठाई' दुकानात कारागीर म्हणून कार्यरत होते आणि ते अमरावतीहून भातकुलीकडे जात होते. सायत गावाजवळ मानकर ढाब्यापासून काही अंतरावर, नंदू सातव यांच्या शेताजवळ हा भीषण अपघात घडला. घटनेची माहिती मिळताच भातकुलीचे पोलीस निरीक्षक राजू राजूलवार आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. नागरिकांच्या मदतीने जखमींना बाहेर काढून रुग्णालयात पाठविण्यात आले तसेच वाहतूक सुरळीत करण्यात आली. चारही मृतदेह जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले असून तेथे नातेवाइकांची मोठी गर्दी जमली होती. परिसरात शोककळा पसरली होती. भातकुली पोलीस ठाण्याचे एएसआय संजय मात्रे यांच्या तक्रारीवरून हुंडाई आयङ्क20 कारचा चालक असलेल्या मृतक प्रेम बिश्नोई याच्याविरोधात बीएनएस कलम 106 (1), 281, 125 तसेच मोटार वाहन कायद्याच्या कलम 184 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# उषःकाळ होता होता काळरात्र झाली!

## छत्र हरवले, राष्ट्रवादी पोरकी!



*रोहित गासे*

***अमरावती, ( दि. 29 )** – साधारणपणे पावणे तीन वर्षांपूर्वी, 2 जुलै 2023 रोजी अजित पवार यांनी काका शरद पवारांविरोधात बंड करून मूळ राष्ट्रवादी काँग्रेसपासून फारकत घेतली. सुमारे 40 पेक्षा अधिक आमदारांसह त्यांनी भाजप-शिवसेना ( शिंदे गट ) युती सरकारमध्ये सहभाग घेतला. त्यावेळी विरोधकांनी या सरकारचे भवितव्य फार काळ टिकणार नाही, असे दावे केले होते. मात्र, प्रत्यक्षात महायुतीने विधानसभेत दमदार कामगिरी करत सत्ता स्थिर केली. त्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे सुमारे 41 आमदार निवडून आले. लोकसभेत एक व राज्यसभेत एक असे दोन खासदार गेले, तर नगर परिषद व नगर पंचायतींमध्ये 37 नगराध्यक्ष निवडून आले. महापालिकांमध्ये अपेक्षित यश न मिळाले तरी अस्तित्व टिकवून ठेवणारी ताकद पक्षाने दाखवली.*









महाराष्ट्रात हळूहळू

स्वतःचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण करत असतानाच काळाने घाला घातला. विमान अपघातात अजित पवारांचे अकाली निधन झाले आणि उगवता उषःकाळ अचानक काळरात्रेत परिवर्तित झाला. 'छत्र हरपले आणि राष्ट्रवादी पोरकी झाली' अशी भावना सर्वत्र उमटू लागली. शरद पवारांची साथ सोडून अजित पवारांसोबत गेलेल्या नेते, पदाधिकारी, गावपुढारी व कार्यकर्त्यांच्या भविष्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अमरावती जिल्ह्याचा विचार केला तर शरद पवारांचे निकटवर्ती व निष्ठावान कार्यकर्ते म्हणून ओळख असलेले संजय खोडके यांचे नाव अग्रक्रमाने येते. शरद पवारांनी त्यांना भरभरून संधी दिली आणि खोडके दाम्पत्यांचे राजकीय भवितव्य घडविले. तरीही संजय खोडकेंनी अजित पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. विकासासाठी सत्तेची साथ आवश्यक असल्याचे त्यांनी तेव्हा सांगितले होते. त्याचा फायदा त्यांना विधानसभा निवडणुकीत झाला, तसेच अजित पवारांनी त्यांना विधानपरिषदेची आमदारकी बहाल करून विदर्भाची जबाबदारीही सोपविली. महापालिका निवडणूकीमध्ये अनेक माजी नगरसेवक, कार्यकर्त्यांनी काँग्रेस, भाजपला रामराम करत अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला.

याचप्रमाणे अमरावती ग्रामीण भागात नेतृत्व करणारे माजी आमदार देवेंद्र भुयार यांनीही शरद पवारांची साथ सोडून अजित पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. तसेच सुरेखा ठाकरे, संतोष महात्मे यांच्यासारख्या जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व उपाध्यक्ष राहिलेल्या नेत्यांनीही अजित पवारांची वाट धरली होती. आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या तोंडावर अनेक कार्यकर्ते आपल्या पुढाऱ्यांसोबत अजित पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये आले. आगामी निवडणूकांसाठी हे कार्यकर्ते जोमाने कामाला लागले होते. अजित पवारांची राष्ट्रवादी अमरावतीत हळूहळू का होईना, पण भक्कम पाय रोवत होती, तर दुसरीकडे शरद पवारांची राष्ट्रवादी अस्तित्वासाठी संघर्ष करत असल्याचे चित्र होते.

अशा परिस्थितीत बुधवारी (दि. 28) संपूर्ण महाराष्ट्र हादरवून टाकणारी घटना घडली. बारामती येथे अजित पवारांचा विमान अपघातात मृत्यू झाला. गुरुवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाले. त्यांच्या चितेचा अग्नी शांत झाला नसतानाच, आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे काय होणार? हा प्रश्न सर्वांच्या मनात धगधगत आहे. दादा गेले, आता आपले राजकीय भविष्य काय? हा एकच प्रश्न आज पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे.

# ब्राम्हणवाडा थडी येथे गोवंश कत्तलीसाठी नेण्याचा प्रयत्न

## सात जनावरे ताब्यात, आरोपी फरार

**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार,( दि.29 )**– अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाणे हद्दीत गौवंश कत्तलीसाठी व विक्रीच्या उद्देशाने नेली जात असलेली सात जनावरे पोलिसांनी ताब्यात घेतली. मात्र कारवाईदरम्यान आरोपी फरार झाला आहे.

दि. 29 जानेवारी रोजी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी ग्राम ब्राम्हणवाडा थडी येथील गजानन महाराज मंदिराजवळील कॅनल परिसरात सापळा रचून छापा टाकला. या कारवाईत आरोपी मुस्ताक खॉ इब्राईम खॉ (वय 52, रा. ब्राम्हणवाडा थडी) याच्या ताब्यातून चार गायी व तीन कालवडी असा एकूण सात गौवंश आढळून आला. या जनावरांची अंदाजे किंमत सुमारे 54 हजार रुपये असून ती कत्तलीसाठी व विक्रीसाठी नेली जात असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी कारवाई सुरू करताच आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. त्याचा पाठलाग करूनही तो सापडला नाही. याप्रकरणी ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध अपराध क्रमांक 32/26 अन्वये महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम 1976 मधील कलम 5 (अ), 5 (ब) व 9 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, सहाय्यक पोलीस अधीक्षक शुभम कुमार (उपविभाग अचलपूर) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. प्रत्यक्ष कारवाईत पोलीस निरीक्षक किरण वानखडे (स्थानिक गुन्हे शाखा), सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव (ठाणेदार), पोहेकॉ राजू मरस्कोल्हे, पोलीस शिपाई अनुप मानकर व चालक पोलीस शिपाई विशाल सिंगल यांनी सहभाग घेतला. फरार आरोपीचा शोध सुरू असून पुढील तपास ब्राम्हणवाडा थडी पोलीस करीत आहेत.



> जनावरांवर बनावट टॅग असल्याचा संशय आहे. टॅगबाबत पशुवैद्यकीय तपासणी सुरू असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठांच्या निर्देशानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.
>
> **प्रशांत जाधव, ठाणेदार**
> **ब्राम्हणवाडा थडी**

# मुऱ्हा देवी येथे इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि. 29 )**– मुऱ्हा (देवी) येथे एका इसमाने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बुधवार, दि. 28 जानेवारी 2026 रोजी घडली. अनिल विश्वास आठवले (वय 45, रा. मुऱ्हा देवी) असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे.



**अनिल विश्वास आठवले**
**मृतक**

मिळालेल्या माहितीनुसार, अनिल आठवले यांनी बुधवारी रात्री सुमारे 9 वाजण्याच्या सुमारास आपल्या घरात गळफास घेऊन जीवनयात्रा संपवली. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. कुटुंबीय व ग्रामस्थांनी तात्काळ याची माहिती पोलिसांना दिली. घटनेनंतर मृतदेह अंजनगाव सुर्जी ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला. तेथे शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक लहान मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास रहिमापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वडतकर यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल गजानन ढोकेकर व पोलीस कॉन्स्टेबल सागर वेलकर करीत आहेत. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.

# पतंग उडवताना घरावरून पडून 13 वर्षीय मुलाचा मृत्यू

**अमरावती, दि. 29 )** –पतंग उडवताना घराच्या छतावरून पडल्याने गंभीर जखमी झालेल्या 13 वर्षीय मुलाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी दुपारी घडली. अनिकेत रजत भोसले (वय 13, रा. बासलापूर, चांदुररेल्वे) असे मृत मुलाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चांदुररेल्वेतील रहिवासी अनिकेत नामक मुलगा हा घराच्या छतावर पतंग उडवत असताना तोल जाऊन खाली पडला.

या अपघातात तो गंभीर जखमी होऊन बेशुद्ध झाला. त्यानंतर त्याच्या आई-वडिलांनी तातडीने त्याला औषधोपचारासाठी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती अनिकेतचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. मृत्यू घोषित केल्यानंतर अनिकेतच्या नातेवाइकांनी मृतदेह



जिल्हा सामान्य रुग्णालयातून थेट उचलून ऑटो रिक्षामध्ये टाकून नेल्याची धक्कादायक घटना घडली. विशेष म्हणजे, यावेळी उपस्थित डॉक्टरांनी किंवा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी त्यांना अडवले नाही. या प्रकारामुळे जिल्हा सामान्य रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्था व प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परंतू त्यानंतर चांदुररेल्वे पोलिसांनी मृताच्या घरी जाऊन नातेवाईकांची समजुत घातली. त्यानंतर अनिकेतच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले. पुढील तपास चांदुररेल्वे पोलिस करीत आहेत.

# अवैध दारू विक्रीविरोधात महिलांचा एल्गार

## काटआमला येथील महिलाग्रामस्थांचा बडनेरा पोलीस स्टेशनवर भव्य मोर्चा

**महासागर प्रतिनिधी**
**बडनेरा,( दि.29 )** – काटआमला गावात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीमुळे निर्माण झालेल्या गंभीर सामाजिक समस्यांविरोधात महिलाग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत बडनेरा पोलीस स्टेशनवर भव्य मोर्चा काढला. गावात किराणा दुकानाच्या नावाखाली खुलेआम अवैध दारूची विक्री सुरू असून त्यामुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडत असल्याचा आरोप महिलांनी केला.

अवैध दारू विक्रीच्या दुकानांमुळे महिलांना नाहक त्रास सहन करावा लागत असून शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांवरही त्याचे विपरीत परिणाम होत आहेत. गावाच्या मुख्य रस्त्यावर अतिक्रमण करून थाटलेल्या या दुकानांमुळे ये-जा करणाऱ्या महिला, मुली व नागरिकांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. याला विरोध केल्यास संबंधित विक्रेते शिवीगाळ, दमदाटी व धमकावण्याचे प्रकार करीत असल्याचे गंभीर आरोपही यावेळी करण्यात आले.

या अन्यायाविरोधात शेकडो महिलांनी एकत्र येत बडनेरा पोलीस स्टेशन गाठले आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील चव्हाण यांना निवेदन सादर केले. अवैध दारू विक्री तात्काळ बंद करावी, अतिक्रमण हटवावे तसेच दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.

महिलांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, त्वरित कार्यवाही न झाल्यास पोलीस स्टेशनसमोर तीव्र आंदोलन छेडले जाईल. दारूमुक्त गाव, सुरक्षित गाव अशा घोषणा देत महिलांनी एकजूट दाखवली. पोलीस प्रशासनाने योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

## शहरात प्रतिबंधात्मक कलम 37 ( 1 ) व ( 3 ) लागू

**अमरावती** – शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम 37 (1) व (3) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश दि. दि. 10 फेब्रुवारीच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आह.

# सहाव्या मजल्यावरून पडून मजुराचा मृत्यू

**अमरावती** – नांदगावपेठ पोलीस ठाणे हद्दीतील पोटे टाउनशिपजवळ सुरू असलेल्या इमारत बांधकामाच्या ठिकाणी सहाव्या मजल्यावरून पडल्याने एका तरुण मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. 28 जानेवारी) सकाळी 9 वाजताच्या सुमारास घडली. मृत मजुराचे नाव अमर तब्बलसिंग धुर्वे (वय 22, रा. गोजापुर, ता. शहापूर, जि. बैतूल, मध्यप्रदेश) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बैतूल जिल्ह्यातील गोराडोंगरी येथील दिवाकर हेमराज मरसकोल्हे (वय 19) हा आपले मामा अमर धुर्वेसोबत अमरावती येथे मजुरीसाठी आले होता. नांदगावपेठ परिसरातील पोटे टाउनशिपलगत, पोदार स्कूलजवळ असलेल्या माधव इमारतीचे बांधकाम सुरू असताना काम करत असताना अचानक अमर धुर्वे यांचा तोल गेला आणि ते सहाव्या मजल्यावरून खाली कोसळले. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. उपस्थित नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी दिवाकर मरसकोल्हे यांच्या जबाबावरून नांदगावपेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराची स्व. अजित पवार यांना अश्रुपूर्ण श्रद्धांजली



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.29 )**– राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांचे बुधवारी (दि. 28) विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला असून अमरावती जिल्ह्यातही राष्ट्रवादी काँग्रेस परिवारात तीव्र दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

स्व. अजित पवार यांच्या अंत्यसंस्काराचे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी आमदार सुलभा खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालयात एलईडी स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली होती. गुरुवारी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार पार पडले. हे दृश्य पाहताना उपस्थित कार्यकर्ते आणि नागरिक भावुक झाले होते. मुखाग्नी देण्याच्या क्षणी अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते.

यावेळी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समर्थक आणि शहरातील नागरिकांनी पुष्पअर्पण करून आदरांजली अर्पण केली. त्यानंतर दोन मिनिटांचे मौन पाळून दिवंगत नेत्यास सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली.

या शोकसभेस माजी महापौर रिना नंदा, माजी नगरसेवक भूषण बनसोड, जितेंद्रसिंह ठाकूर, नगरसेवक प्रमोद महल्ले, नगरसेविका मीनल सवाई, अर्चना पाटील, मोहन क्षीरसागर, आनंद मिश्रा, निलेश शर्मा, विशाल खोडके, अंजली केवले, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अध्यक्ष ऋृराज राऊत, ॲड. सुनील बोळे, एपीएमसी संचालक प्रमोद राऊत यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी 'अमर रहे... अमर रहेज अजित पवार अमर रहे...' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला आणि राष्ट्रवादी काँग्रेस अमरावती परिवाराने स्व. अजित पवार यांना अश्रुपूर्ण वातावरणात अखेरचा निरोप दिला.

# आम्ही सुधारणार नाही!

## वर्गखोल्या आहेत की, डंपिंग ग्राउंड

## सांगळूदकर महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट खेळ

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर,( दि.29 )**– येथील जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयात अस्वच्छतेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे, साचलेल्या कचऱ्यामुळे वर्गखोल्या डंपिंगखोल्यांप्रमाणे भासायला लागल्या आहेत. शिक्षणाचे पवित्र मंदिर मानल्या जाणाऱ्या महाविद्यालयातच अशी दयनीय अवस्था असल्याने पालक, विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महाविद्यालयातील स्वच्छतेचा मुद्दा वारंवार ऐरणीवर



येत असताना महाविद्यालय प्रशासन मात्र सुधारयचे नाव घ्यायला तयार नाही.

महाविद्यालयातील काही वर्गखोल्यांमध्ये कागदांचे ढीग, प्लास्टिक पिशव्या, धूळ-मळ आणि इतर घाणीचा प्रचंड साठा दिसून येतो. या परिस्थितीत विद्यार्थ्यांना बसून शिक्षण घेणे कठीण झाले आहे. दुर्गंधी, माशा व डासांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला असून, विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या गंभीर बाबीकडे महाविद्यालय प्रशासन, विशेषतः प्राचार्य, जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप होत आहे. भीतीच्या वातावरणामुळे अनेक विद्यार्थी उघडपणे तक्रार करण्यास धजावत नसल्याचेही वास्तव समोर आले आहे. नियमित स्वच्छता, कचऱ्याचे वर्गीकरण, वर्गखोल्या व स्वच्छतागृहांची दैनंदिन साफसफाई याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये आहे. विशेष म्हणजे, दै. महासागरने 16 जानेवारी रोजी या अस्वच्छतेबाबत वृत्त प्रसिद्ध केले होते. मात्र त्यानंतर तब्बल आठ दिवस उलटूनही परिस्थितीत कोणताही सुधार झालेला नाही. आजही विद्यार्थी कचऱ्यातच बसून शिक्षण घेत असल्याचे चित्र कायम आहे. यामुळे प्राचाऱ्यांच्या उदासीन व मनमानी कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या प्रकरणाकडे वरिष्ठ अधिकारी व उच्च शिक्षण विभागाचे लक्ष वेधले जावे, अशी जोरदार मागणी होत आहे. विद्यार्थ्यांनी व पालकांनी प्रशासनाकडे तात्काळ हस्तक्षेप करून स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी कठोर आणि त्वरित उपाययोजना करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

# विलीनीकरण की नवा संघर्ष?

## 'दादां'च्या जाण्याने निर्माण झालेली सहानुभूती मतांमध्ये रूपांतरित होणार की पक्ष विखुरला जाणार?

■ संदीप काळे

अजित दादा यांच्या निधनाने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. शरद पवार यांची आता अघोषित सेवानिवृत्ती असेल, दिल्लीचे राजकारण सुप्रिया सुळे यांच्याकडे असेल, दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित येतील,पार्थ पवार, रोहित पवार पवारांचे राजकारण पुढे चालवतील, हे आज ना उद्या आता पुढे येईल? राज्याच्या राजकारणात सुप्रिया सुळे यांना पवारांच्या कन्या म्हणून अजितदादा यांच्या बहीण म्हणून कितपत स्वीकार करेल यावर शंका आहे. असे अनेक जर तरचे विषय आहेत. दादांच्या जाण्याने राज्याची झालेली हानी कोणीही भरून काढू शकत नाही.



सत्तेचे गणित, पक्षाचे नेतृत्व, प्रशासकीय शिस्त आणि आगामी निवडणुकांची दिशा या सर्व बाबी एकाच वेळी अनिश्चिततेच्या छायेत गेल्या आहेत. अजित पवार हे केवळ एक राजकीय नेते नव्हते, तर निर्णयक्षम प्रशासक, कडक शिस्तीचे प्रतिक आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाचे सर्वस्व होते. त्यांच्या जाण्याने पक्षासमोर नेतृत्वाचा मोठा पेच निर्माण झाला असून, पुढील वाटचाल कोणाच्या हाती जाणार, याबाबत तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

अजित पवारांच्या पश्चात पक्षाचे नेतृत्व कोण सांभाळणार, यावरून राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क मांडले जात आहेत. राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व सोपवले जाऊ शकते, अशी चर्चा जोर धरू लागली आहे.

कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्याबद्दल भावनिक ओलावा असून, पवार कुटुंबाचा चेहरा म्हणून त्या पक्षाला एकत्र ठेवू शकतील, असे मत अनेक नेत्यांकडून व्यक्त होत आहे.

दुसरीकडे अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार राजकारणात सक्रिय असले तरी प्रशासकीय अनुभवाचा अभाव ही त्यांची मर्यादा मानली जात आहे. त्यामुळे सुरुवातीच्या काळात त्यांना सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखालीच काम करावे लागेल, असे संकेत मिळत आहेत. पक्षाची संघटनात्मक बांधणी, संसदीय राजकारण आणि दिल्लीतील हालचाली हाताळण्यासाठी तटकरे आणि पटेल यांची भूमिका आगामी काळात निर्णायक ठरणार आहे.

दरम्यान, अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन गट पुन्हा एकत्र येण्याची चर्चा नव्याने वेग घेत आहे. शरद पवार गट आणि अजित पवार गट यांच्या विलीनीकरणाबाबत आधीपासूनच कुजबुज सुरू होती.

५ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांबाबत दोन्ही गटांनी एकत्र लढण्याचे संकेत यापूर्वीच दिले होते. आता दादांच्या जाण्यामुळे निर्माण झालेल्या भावनिक वातावरणात हे विलीनीकरण जलद गतीने होण्याची शक्यता राजकीय विश्लेषक व्यक्त करत आहेत.

मात्र, जर दोन्ही गट एकत्र आले, तर राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा महाविकास आघाडीचा भाग बनेल. असे झाल्यास सध्या सत्तेत असलेले ४१ आमदार भाजपसोबतच राहण्यावर ठाम राहिले, तर पक्षात पुन्हा एकदा फूट पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अजित पवार हे महायुती सरकारमधील अत्यंत महत्त्वाचा दुवा होते. अर्थमंत्री म्हणून त्यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा सुमारे सात लाख कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडला होता. राज्याच्या आर्थिक नियोजनात त्यांचा अनुभव आणि पकड सर्वमान्य होती. त्यांच्या निधनानंतर हा अर्थसंकल्प प्रभावीपणे राबवणे हे नव्या अर्थमंत्र्यासमोर मोठे आव्हान ठरणार आहे.

यासोबतच आगामी निवडणुकांसाठी महायुतीतील जागावाटपाचे गणित ठरवताना अजित पवारांची निर्णायक भूमिका राहायची. आता ही जबाबदारी कोण पार पाडणार, हा प्रश्न महायुतीसमोर उभा राहिला आहे.

बारामतीचा विकास आणि तेथील राजकारण अजित पवारां भोवतीच फिरत होते. त्यांच्या निधनामुळे बारामतीकरांनी आपला राजकीय आधार गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने, सहकारी बँका आणि सहकार क्षेत्रात त्यांचा मोठा दबदबा होता. त्यांच्या जाण्याने या क्षेत्रातही नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे.

दादा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजित पवारांचा कार्यकर्ता वर्ग अत्यंत मोठा आणि कट्टर होता. त्यांच्या अचानक जाण्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नैराश्य पसरले असून, अधिकाऱ्यांकडून काम करून घेण्याची त्यांची थेट, कडक आणि परिणामकारक शैली आता कोणाकडेही नसल्याची भावना व्यक्त होत आहे.

अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राज्यात अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती मिळाली होती, मात्र त्यातील अनेक प्रकल्प अजून अपूर्ण अवस्थेत आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड मेट्रो विस्तार, पुणे मेट्रो फेज-२, हिंजवडी-चाकण औद्योगिक पट्ट्याला जोडणारी मेट्रो, तसेच पिंपरी ते निगडी मेट्रो मार्ग हे प्रकल्प अजित पवारांच्या विशेष लक्षाखाली होते.

जलसंपदा मंत्री म्हणून त्यांनी नार, पार, गिरणा नदीजोड प्रकल्प, भामा, आसखेड फेज २ आणि पवना धरण ते निगडी बंदिस्त वाहिनी यांसारख्या प्रकल्पांना गती दिली होती. बारामतीला स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य संग्रहालय आणि माळेगाव नगरपंचायतीचा कायापालट हे प्रकल्पही अजून अंतिम टप्प्यावर आहेत.

पुणे रिंग रोड, शिरूर उन्नत महामार्ग, मुळा, मुठा रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट, तसेच महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर नेण्याचे २०२६-४७ व्हिजन, चाळीस लाख कोटींची गुंतवणूक आणि पन्नास लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट हे सगळे प्रकल्प आणि धोरणे आता नव्या नेतृत्वावर अवलंबून राहणार आहेत.

अजित पवारांची काम करण्याची पद्धत अत्यंत काटेकोर होती. ते अनेकदा शनिवार किंवा रविवार सकाळी सहा वाजता स्वतः प्रकल्पस्थळी जाऊन कामाचा आढावा घेत. त्यांच्या निधनानंतर असा कडक फॉलोअप घेणारा प्रशासक न मिळाल्यास हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प रेंगाळण्याची भीती राजकीय व प्रशासकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.

अजित पवारांच्या निधनामुळे निर्माण झालेली सहानुभूतीची लाट आगामी निवडणुकांमध्ये पक्षाकडून राजकीयदृष्ट्या वापरण्याचा प्रयत्न केला जाण्याचीही शक्यता आहे. मात्र, ही सहानुभूती नेतृत्वाच्या ठोस निर्णयांमध्ये आणि संघटनात्मक ताकदीत रूपांतरित होते की नाही, यावरच राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाराष्ट्राच्या राजकारणाची पुढील दिशा ठरणार आहे.

आता शरद पवार यांनी मोठे मन करणे आणि सेवानिवृत्ती घोषीत करणे, सुप्रिया सुळे यांनी केवळ दिलीचे राजकारण पाहणे? आणि अजित दादा यांच्यावर अवंलबून असलेल्या, स्वप्ना उराशी बाळगणाऱ्या त्या प्रत्येक नेता, कार्यकर्त्याला न्याय देणे हीच सर्वांच्या मनातील मुख्यमंत्री अजित दादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे अजित दादांवर प्रेम करणारे अनेक कार्यकर्ते आज बारामती मध्ये उघडपणे बोलत होते.

(लेखक महासागर मीडिया ग्रुपचे मुख्य समूह संपादक आहेत.)

# निरोप एका लोकदरबाराचा

## मंत्रालयासमोरील 'अ-४' बंगला आता पोरका दादांची ती शिस्त आणि जनसेवेचं 'अजितपर्व' थांबलं

■ दिपक कैतके

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नेते आले आणि गेले, पण प्रशासनावर वज्रमुठ आणि जनतेच्या प्रश्नांसाठी पहाडासारखा खंबीर आधार अशी ओळख निर्माण करणारा नेता म्हणजे अजित आशाताई अनंतराव पवार. मंत्रालयासमोरील 'अ-४' हा बंगला केवळ एक शासकीय निवासस्थान किंवा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यालय नव्हते, तर ते हजारो गोरगरीब जनतेच्या आशा-आकांक्षेचे केंद्र होते. पण आज तिथे शांतता पसरली आहे. दर बुधवारी गजबजणारा तो 'जनता दरबार' आता कायमचा इतिहासजमा झाला आहे.

### पाचचा ठोका आणि दादांची एन्ट्री



दर बुधवारी मंत्रालयात मंत्रिमंडळाची बैठक संपली की, बरोबर पाचचा ठोका पडण्यापूर्वी अजितदादांचे वाहन मंत्रालयासमोरून निघून थेट राष्ट्रवादीच्या प्रदेश कार्यालयात दाखल व्हायचे.

दादा आले की जणू संपूर्ण यंत्रणेत विद्युत संचार व्हायचा. वेळेचे पक्के असलेल्या दादांच्या दरबारात पाच म्हणजे पाचच! ते कधीही उशिरा आले नाहीत आणि त्यांनी कोणाला विनाकारण ताटकळत ठेवले नाही. त्यांचा हा दरबार म्हणजे केवळ राजकीय सोहळा नव्हता, तर ती सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी खुली असलेली एक थेट अदालत होती.

### यंत्रणेची शिस्त आणि माणुसकीची जोड



जनता दरबारच्या दिवशी पक्ष कार्यालयात एक वेगळीच लगबग असायची. पण ही लगबग गोंधळाची नव्हती, तर ती दादांनी लावलेल्या 'शिस्तीची' होती. कार्यालयीन कर्मचारी, सुरक्षा रक्षक, कॅन्टीनमधील पोरं आणि लिपिक वर्ग एखाद्या शिस्तबद्ध सैन्यासारखा सज्ज असायचा.

कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला पाणी मिळावं, त्याला चहा विचारला जावा, कोणाचीही अडवणूक होऊ नये, याबाबत दादांच्या सक्त सूचना होत्या.

अजितदादा नेहमी सांगायचे, समोर आलेला माणूस कार्यकर्ता असो किंवा सामान्य नागरिक, त्याच्याशी आधी माणुसकीने वागा. तो इथे आशेने आलाय, त्याला रिकाम्या हाताने पाठवू नका. म्हणूनच रांगेत शेवटचा माणूस उभा असेपर्यंत दादा आपली खुर्ची सोडत नसत.

त्यांच्या टेबलावर अर्जांचे वर्गीकरण व्हायचे, फोनवर तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना आदेश दिले जायचे आणि 'काम होईल' हा शब्द मिळाला की येणाऱ्याच्या चेहऱ्यावरचं समाधान दादांसाठी लाखमोलाचं असायचं.

### कर्मचाऱ्यांचा 'हक्काचा माणूस' हरपला

आज अ-४ बंगल्याच्या परिसरात एक भयाण शांतता आहे. जे कर्मचारी दादांच्या एका शब्दावर धावत सुटायचे, त्यांच्या डोळ्यांत आज अश्रू आहेत. सुरक्षारक्षकांपासून ते कॅन्टीनमधील कामगारांपर्यंत प्रत्येकाला दादांनी आपलंसं केलं होतं.

केवळ कामच नाही, तर त्यांच्या वैयक्तिक अडीअडचणीतही दादा उभे राहायचे. ७०-८० च्या दशकातील राजकारणाची शिस्त आणि आधुनिक प्रशासनाचा वेग यांचा मेळ म्हणजे अजितदादा होते. आज हे कार्यालय त्यांच्या आठवणींचे साक्षीदार बनले आहे.

### इतिहासजमा झालेला 'जनता दरबार'

राष्ट्रवादी काँग्रेसच्या परंपरेनुसार मंगळवार ते गुरुवार मंत्र्यांचे जनता दरबार चालतात आणि ते पुढेही कदाचित सुरू राहतील. पण बुधवारी संध्याकाळी ज्या दरबारात 'खुद्द दादा' समोर असायचे, तो गजबजाट आता पुन्हा दिसणार नाही.

महाविकास आघाडी असो वा महायुती सरकार, दादांनी आपली ही लोकसेवेची व्रत कधीही खंडित होऊ दिले नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक मोठे धोरणात्मक निर्णय घेणारे दादा, संध्याकाळी मात्र साध्या शेतकऱ्याच्या बांधावरचा प्रश्न सोडवण्यासाठी तितक्याच तन्मयतेने काम करायचे.

### बारामतीची 'पॉवर' आणि जनसामान्यांचा 'पवार'

'बारामती पॉवर' म्हणजेच 'पवार' हे नाव अजितदादांनी आपल्या कामातून सिद्ध केले होते. त्यांच्या कार्यशैलीची प्रतिमा आणि जनतेशी असलेले थेट नाते या आठवणींच्या रूपाने कायम राहणार आहे.

ज्या फाईलला कोणी हात लावायला घाबरायचे, ती फाईल दादांच्या एका सहीने मार्गी लागायची. मंत्रालयाचा सहावा मजला असो किंवा प्रदेश कार्यालयाचा जनता दरबार, दादांची जरब आणि माणुसकी या दोन टोकांचा संगम तिथे पाहायला मिळायचा.

आता मंत्रिमंडळाच्या बैठका होतील, नवे मंत्री येतील, नवे दरबारही भरतील... पण मंत्रालयासमोरच्या त्या कार्यालयात बुधवारी संध्याकाळी पाच वाजता ज्याची प्रतीक्षा असायची, तो हक्काचा 'दादा' मात्र तिथे नसेल. अजित पवारांचा तो रोखठोक आवाज, अर्जावरची ती स्वाक्षरी आणि कार्यकर्त्यांच्या खांद्यावर पडणारा तो आश्वासक हात आता केवळ आठवणींच्या खंडात जमा झाला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवारांचा दर बुधवारचा जनता दरबार आता थांबला आहे... पण त्यांनी लाखो लोकांच्या हृदयात सुरू केलेला 'माणुसकीचा दरबार' कधीही थांबणार नाही.

(लेखक हे महासागर मीडिया ग्रुपचे मुंबई येथे मंत्रालय प्रतिनिधी आहेत.)

# महाराष्ट्रावर आर्थिक संकट

अजित पवारांनंतर महाराष्ट्राचे आर्थिक भवितव्य हा प्रश्न आज केवळ राजकीय न राहता थेट अर्थकारणाशी जोडला गेला आहे. अजित पवार हे महाराष्ट्राच्या तिजोरीचे अत्यंत कुशल व्यवस्थापक मानले जात. आकड्यांवरील अचूक पकड, प्रशासकीय शिस्त आणि निर्णयांची गती यांमुळे त्यांना राज्याच्या आर्थिक व्यवस्थेचा ह्यकणाह्ण म्हटले जायचे. त्यांच्या अचानक निधनानंतर महाराष्ट्राच्या आर्थिक नियोजनासमोर मंदीचा धोका उभा राहील की ही केवळ एक संक्रमणकालीन अवस्था ठरेल, यावर सध्या सखोल चर्चा सुरु झाली आहे.

■ व्यंकटेश नारायणराव जोशी

२०२५-२६ या आर्थिक वषार्साठी अजित पवारांनी ७,२०,०२० कोटींचा विक्रमी अर्थसंकल्प सादर केला होता. या अर्थसंकल्पात राज्याची अपेक्षित महसुली पावती ५,६३,७८६ कोटी इतकी असून महसुली खर्च ६,०६,८५५ कोटी इतका आहे. यामुळे राज्यास सुमारे ४५,८९१ कोटींच्या महसुली तुटीचा सामना करावा लागणार आहे.




ही तूट भरून काढण्यासाठी महसूल वाढवण्याच्या कडक उपाययोजना अजित पवारांनी आखल्या होत्या. करसंकलनात शिस्त, थकीत कर वसुली, अप्रत्यक्ष करांमधील गळती रोखण्यावर त्यांचा भर होता. त्यांच्या अनुपस्थितीत जर महसूल संकलनाची गती मंदावली, तर ही महसुली तूट वाढण्याची व विकासकामांवर आर्थिक कात्री लागण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सध्या महाराष्ट्रावर सुमारे ९.३ लाख कोटींचे विक्रमी कर्ज आहे. या कर्जाच्या पार्श्वभूमीवरही अजित पवारांनी वित्तीय शिस्त कायम ठेवत राज्याची वित्तीय तूट सकल राज्य उत्पन्नाच्या म्हणजेच GSDP च्या २.८ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवली होती, जी सुमारे १,३६,२३५ कोटी इतकी आहे. मात्र, कर्जाचा डोंगर वाढत असताना जर नवीन गुंतवणूक, औद्योगिक विस्तार आणि उत्पादकतेत वाढ झाली नाही, तर राज्याच्या तिजोरीवर व्याजाचा मोठा बोजा पडू शकतो.



अशा स्थितीत प्रशासकीय शिस्त सैल झाली, तर वित्तीय तूट मर्यादेबाहेर जाण्याचा धोका असून राज्याची आर्थिक पत आणि गुंतवणूकदारांचा विश्वास दोन्ही डळमळीत होण्याची शक्यता आहे.

अजित पवारांनी महाराष्ट्राला २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर म्हणजेच सुमारे ८४ लाख कोटींची अर्थव्यवस्था बनवण्याचे स्पष्ट उद्दिष्ट समोर ठेवले होते. या व्हिजनसाठी पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याचा आग्रह धरला होता.

पुणे आणि मुंबई मेट्रो विस्तार, ज्यासाठी सुमारे ७६,७०८ कोटींचे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत, नागपूर मेट्रो फेज,२, धारावी पुनर्वसन प्रकल्प, तसेच रस्ते, बंदरे आणि लॉजिस्टिक हब यांसारख्या मोठ्या प्रकल्पांसाठी निधीचा सातत्यपूर्ण ओघ सुरू ठेवण्यात आला होता. मात्र, अशा प्रकल्पांच्या फाईल्स जर मंत्रालयीन पातळीवर अडकून राहिल्या, तर प्रकल्प खर्चात वाढ होण्याचा धोका असतो. यामुळे खासगी गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होऊन औद्योगिक मंदीचे वातावरण निर्माण होऊ शकते.

ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सहकार क्षेत्रावर अजित पवारांचा प्रभाव विशेषत्वाने जाणवायचा. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने, सहकारी बँका आणि दूध संघटनांचे आर्थिक गणित मोठ्या प्रमाणात त्यांच्या निर्णयांवर अवलंबून होते. ग्रामीण भागातील नगद प्रवाह म्हणजेच कॅश फ्लो नियंत्रित ठेवण्यात त्यांचा वचक होता. त्यांच्या निधनानंतर या संस्थांमध्ये जर राजकीय हस्तक्षेप वाढला, तर ग्रामीण बाजारपेठेतील उलाढाल मंदावण्याची आणि शेतकरी व सहकार क्षेत्र आर्थिक अस्थिरतेकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

(उर्वरीत भाग पान ८ वर)

# 'दादा' पर्मनंट नॉट रिचेबल

दादांचे विमान अपघातात निधन झाल्याची बातमी अत्यंत धक्कादायक आणि मनाला चटका लावणारी ठरली. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचे, कार्यक्षम आणि स्पष्टवक्ते नेतृत्व हरपले आहे. दादा या शब्दातच आधार होता. महाराष्ट्राच्या भल्यासाठी होणारी 'दादा'गिरी अशा अवेळी काळाच्या पडद्याआड जाणे ही नियतीने केलेली क्रूर थट्टा ठरली आहे. महाराष्ट्रासाठी हे अत्यंत दुर्दैवी आहे. विकासाचा ध्यास आणि प्रशासनावर असलेली पकड यामुळे दादांनी जनमानसात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली होती. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्राची ही कधीही न भरून निघणारी हानी आहे. दादांचा अनेकांना प्रचंड आधार होता, तो आधार निसटल्यामुळे सर्वांनाच प्रचंड मानसिक वेदना होत आहे. महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात काही चेहरे असे होते, ज्यांच्याशी मतभेद असले तरी मनभेद कधीच निर्माण झाले नाहीत. विचारांची लढाई होती, मात्र व्यक्तिमत्त्वाबद्दल आदर सर्वपक्षीय होता. दुर्दैवाने, अशी उंची गाठलेली माणसं नियतीने वारंवार आपल्यातून हिरावून नेली. वायएसआर राजशेखर रेड्डी, माधवराव शिंदे, राजेश पायलट, बालयोगी, दोरजी खंडू असे दिग्गज नेते यापूर्वी विमान अपघातामध्ये मृत्युमुखी पडलेले आहेत. स्वतः देवेंद्र फडणवीस हे सहा वेळा त्यांच्या हेलिकॉप्टर मधून जाताना अपघातग्रस्त होता होता वाचलेले आहेत. संजय गांधी आणि माधवराव शिंदे यांचा अपवाद वगळता जे काही व्हीआयपी अपघात आहे ते शक्यतो हेलिकॉप्टर मधून घडलेले अपघात आहेत. कारण विमानापेक्षा हेलिकॉप्टरला अपघाताची संभावना टेक्निकली जास्त असते असे त्या क्षेत्रातले कुठलेही तज्ञ सांगतील. प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख, आर. आर. आबा हे सारे राजकारणात अजून बरंच देऊ शकणारे नेते होते. अनुभव परिपक्वतेच्या टप्प्यावर येत असतानाच काळाने त्यांची वाट अडवली. जनतेच्या आशा, कार्यकर्त्यांची स्वप्नं आणि महाराष्ट्राच्या अपेक्षा अपूर्णच राहिल्या. अजितदादांचं जाणंही याच मालिकेतील आणखी एक धक्का ठरलं. दीर्घ संघर्षातून घडलेलं नेतृत्व अचानक थांबतं, तेव्हा केवळ व्यक्ती जात नाही, तर एक संपूर्ण काळ संपतो. डॉ. श्रीकांत जिचकार यांसारखी असामान्य बुद्धिमत्ता आणि निष्ठावंत नेतृत्वही काळाच्या ओघात हरपलं. हे सारं पाहताना अंतर्मुख करणारी शंका मनात उगम पावते की, महाराष्ट्राच्या राजकारणाला अशी अपरिहार्य किंमत मोजावीच लागते आहे का? राजकारणात अनेकदा अजितदादा पवार नाराज झाल्यानंतर वृत्तपत्रांमध्ये कायम एक बातमी येत असायची की, 'दादा नॉट रिचेबल'. पण दादा 'परमनंट नॉटरिचेबल' होतील असे कधीच वाटले नव्हते. दादांच्या निधनाची बातमी महाराष्ट्राला धक्का देणारी तर ठरलीच, पण शरद पवार यांच्यासारख्या वटवृक्षाला इतकं खचलेलं आजवर कधीच कुणी बघितलेलं नव्हतं. कातरलेले शब्द, पाणावलेले डोळे, घोगरा आवाज, भावनांना बांध घालण्याचा अयशस्वी प्रयत्न महाराष्ट्र पाहत होता. दादांच्या धक्कादायक निधनानंतर माध्यमांसमोर खचलेले कुटुंबप्रमुख शरद पवार यांना बघतांना पाहून कुटुंबावरील आघाताची कल्पना येते. मरणाच्या अखेरीपर्यंत दादांजवळ असलेले लोकांचे ढीगभर अर्ज रक्ताने माखले होते. अनेक अर्ज त्यांच्या मरणाच्या शेजारी खच होऊन पडले होते. हीच त्यांच्या कामाची साक्ष ठरली. अजितदादासारखा मनाला भावणारा, कामाचा माणूस, दूरदृष्टी राजकारणी पुन्हा होणे नाही!

मृत्यू हे जीवनाचं अंतिम आणि अटल सत्य आहे. तो कुणाला कधी, कुठे आणि कसा भेटेल याचा काहीही नेम नाही. सकाळी हसत घराबाहेर पडलेली व्यक्ती संध्याकाळी परत येईलच याची खात्री नसते. तरीही आपण हे सत्य विसरून रोजच्या धावपळीत, ताणतणावात आणि अपेक्षांच्या ओझ्याखाली जगत राहतो. उद्याची चिंता, भविष्याची भीती आणि अजून मिळवायचं आहे, या विचारात आजचा क्षण निसटून जातो. आजूबाजूला घडणाऱ्या दुःखद घटना आपल्याला क्षणभर थांबवतात. मन सुन्न होतं, डोळे पाणावतात आणि आयुष्य किती नाजूक आहे याची जाणीव होते. त्या वेळी लक्षात येतं की पैसा, पद, प्रतिष्ठा, सत्ता या सगळ्या गोष्टी तिथेच थांबतात. माणसासोबत जातं ते फक्त त्याने कमावलेलं प्रेम, माणुसकी आणि लोकांच्या मनात उरलेली आठवण.

■ जयंत महाजन



आज शब्दही थबकले आहेत. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील एक तेजस्वी पर्व काळाच्या पडद्याआड गेले. महाराष्ट्राचो 'दादा' आज आपल्यातून निघून गेले. सामान्य माणसाच्या कणखर नेतृत्वाचा आधारवड कोसळला आहे. लोकांच्या प्रश्नांसाठी नेहमी उघडी दारे, संवेदनशील मन आणि ठाम निर्णयक्षमता असलेले नेतृत्व हरपले आहे. सर्वांसाठी ते फक्त नेते नव्हते, तर आधार, विश्वास आणि प्रेरणा होते. दादांनी आयुष्यभर धावपळ केली.

त्यांच्यासोबत सगळ्यांना धावायला लावायचे ते ही एकदम पट्टीत. पत्रकार बातम्या करायचे, दादा पहाटेच अमक्या ठिकाणी पोहोचले, तमक्या अधिकाऱ्याला झापलं. काम पुन्हा करायला सांगितलं. काम म्हणलं की त्यांच्यात जोम असायचा. दादांना भेटलं की काम होतंय हा मंत्रालयातला एक अलिखित नियम. म्हणूनच मुख्यमंत्र्यांइतकाच गजबजाट दादांच्या ऑफिसला असायचा.

कागद हातात आलाय आणि त्याचं उत्तर दादांकडे नाही असं कधी झालं नाही. कामाची त्यांची स्टाईल आणि किस्से त्यांच्यासोबत काम करणारे अधिकारी आणि मित्र सांगत असतात. दादा एखाद्या दौऱ्याला गेलेत आणि त्यांना एखादं मजेशीर कॅरेक्टर भेटलं नाही असं झालं नाही.

कुणीतरी खालून भाषण सुरू असताना 'आय लव्ह यु दादा' म्हणावं आणि दादांनी म्हणावं 'अरे बायकोला म्हण लव्ह यु लव्ह यु'. कार्यक्रमात कुणीतरी चिठ्ठी द्यावी आणि त्यात मोकाट जनावरांचा विषय द्यावा. दादांनी त्यावरून विनोद करावा.

फडणवीस-शिंदे आणि दादा सोबत असताना शिंदेंनी काहीतरी बोलावं आणि दादांनी 'हमारा फिक्स है हम जा रहे है' 'अजून विसरले नाहीत' असे पंच टाकावेत. सगळे लोटपोट व्हावेत. कुठेतरी गाडी थांबवावी मिसळ खावी, चहा घ्यावा, म्हाताऱ्या कोताऱ्यांना भेटावं काम जाणून घ्यावं, थोडीशी मस्ती करावी. दादांच्या अशा किस्यांचाच एखादा खंड होईल.

राजकारणात काही तडजोडी झाल्या तरी कुटुंब म्हणून त्यांची आपुलकी कायम राहिली. बाहेरच्यांना कुटुंबात जास्त घुसू दिलं नाही. राजकारण वेगळं आणि कुटुंब वेगळं हे तंत्र त्यांनी कसोशीने पाळलं. त्यामुळं पक्ष फुटीनंतर सुद्धा अनेक जिव्हाळ्याचे क्षण आपण पाहिले.

राजकीय भूमिकांमुळे काही आरोपांमुळे त्यांच्यावर टीकाही झाल्या. मात्र त्याला दादांनी फार किंमत दिली नाही. त्यांचं व्हिजन क्लिअर होतं, तसे ठामपणे निर्णय त्यांनी घेतले. विरोधक सुद्धा ज्यांची स्तुती करतात. कारण ते अजातशत्रू दादा होते.

आपला मोठा माणूस हरवला. महाराष्ट्राला पोरके करून निघून गेला. प्रेरणादायी असणारा बोलीचा स्पर्श आणि रांगडी भाषाशैली, कृषी, सहकार आणि ग्रामीण प्रश्नांचे खोलीचे अभ्यासक, उत्तम प्रशासक, लोकाभिमुख नेतृत्व, सत्ता गेल्यानंतर हातावर हात ठेऊन बसू शकत नाही. काम करणारा कार्यकर्ता असल्यामुळे थांबवलेली विकास कामे, पक्ष आणि कार्यकर्ते सांभाळण्यासाठी 'मला राजकीय तडजोड करावी लागली' असे जाहीरपणे सांगणारे ते परखड वक्ते होते.

शब्दाचा पक्का, कामात वाघ, महाराष्ट्राच्या राजकारणातील अजित पवार्चा अकाली अस्त कुणाच्याही पचनी पडायला तयार नाही.महाराष्ट्राच्या राजकारणातील एक झंझावात, प्रशासनावर जरब असणारे कणखर नेतृत्व आणि जनसामान्यांचे लाडके 'दादा' गेल्याची बातमी अत्यंत धक्कादायक आणि मनाला चटका लावून जाणारी ठरली.

पहाटेच्या वेळी कामाला सुरुवात करणारा हा 'लोकाभिमुख' नेता शांत झाला. बारामतीपासून मंत्रालयापर्यंत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या दादांनी नेहमीच विकासाला प्राधान्य दिले. सडेतोड बोलणे आणि दिलेला शब्द पाळणे ही त्यांची ओळख महाराष्ट्राच्या राजकारणात सदैव अजरामर राहील. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावरील एक तेजस्वी तारा निखळला आहे.

शिस्त, स्पष्टवक्तेपणा आणि अहोरात्र कष्ट करण्याची त्यांची वृत्ती सर्वांसाठी कायम प्रेरणादायी होती. राज्याच्या विकासातील त्यांचे योगदान कधीही विसरता येणार नाही. वक्तशीरपणा, स्पष्टवक्तेपणा, प्रशासनिक नैपुण्य, संवेदनशील नेतृत्व आणि या सर्वांचा आधार असलेले धडाडीचे विकासोन्मुख राजकारण, असे विलक्षण कार्यकर्तृत्वाचे योगदान महाराष्ट्र सदैव स्मरणात ठेवेल.

त्यांनी वेगळ्या राजकीय भूमिका घेतल्या असल्या तरी समोरच्यांना देखील वेळोवेळी उघडं पाडलं. व्हिजन पाहिजे तर दादांसारखा नेता पाहिजे, दादांनी केलेली अनेक कामं सांगता येतील, शिवाय कुणाचंही काम असो ते बेष्ट झालं पाहिजे, यासाठी आग्रही असणारा हा व्हिजनरी नेता होता. जमिनीशी घट्ट नाळ जुळलेला नेता होता.

ग्रामपंचायत ते केंद्रीय मंत्रालय सगळ्या स्तरातील प्रश्नांची उत्तम जाण असलेला नेता होता. असे नेते फार कमी घडतात, अर्थात दादा घडण्यामागे शरद पवार आहेत; मात्र यात त्यांची मेहनत, अभ्यास, सातत्य आणि लोकांची जुळलेली नाळ या गोष्टी दादांना 'दादा' बनवून जातात. दादांची तुलना शरद पवारांशी व्हायची; मात्र त्यांनी स्वतःला तिकडं नेलं नाही, ते स्वतः भन्नाट होते.

दादांच्या बातम्या बघणारी कित्येक लोकं भावुक झालीत, पवार फॅमिली आणि दादांवर प्रेम करणारी माणसं यातून कशी सावरतील हा प्रश्नच आहे. धक्के देण्यात दादा माहीर होते, मात्र एवढा मोठा धक्का द्याल असं वाटलं नव्हतं.

आता अर्थसंकल्पीय अधिवेशन येतंय, दादा बजेट मांडताना दिसले असते, काही शेर आले असते, काही टोलेबाजी झाली असती, मजा आली असती. अजातशत्रू नेता गेल्यामुळे दादांची धावपळ थांबली; पण महाराष्ट्र सुन्न झालाय!

(लेखक महासागर मीडिया ग्रुपचे नाशिक येथील निवासी संपादक आहेत.)

# अजित दादांच्या अंत्यसंस्काराच्या वेळची अश्रूचित्रे






**प्रचंड संयम आणि धैर्य:** इतका मोठा आघात होऊनही कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांपासून तरुण पिढीपर्यंत सर्वांनी कमालीचा संयम राखला. भावनांचा बांध फुटलेला असतानाही सार्वजनिक ठिकाणी त्यांनी स्वतःला सावरले.

**कार्यकर्त्यांचा विचार प्रथम:** स्वतःचे वैयक्तिक दुःख बाजूला ठेवून, लांबून आलेल्या हजारो कार्यकर्त्यांना दादांचे दर्शन मिळावे यासाठी कुटुंबाने चोख नियोजन केले. स्वतःच्या दुःखापेक्षा जनतेच्या भावनेला त्यांनी महत्त्व दिले.

**साधेपणा आणि शिस्त:** इतके मोठे प्रस्थ असूनही अंत्यविधीमध्ये कोणताही बडेजाव नव्हता. अतिशय साध्या आणि पारंपारिक पद्धतीने सर्व विधी पार पाडले गेले, जे त्यांच्या संस्कारांचे दर्शन घडवते.

**अजातशत्रुत्व:** अंत्यसंस्काराला सर्वपक्षीय नेत्यांची झालेली गर्दी हे पवार कुटुंबाच्या 'राजकारण विरहित' मैत्रीचे प्रतीक होते. वैचारिक मतभेद असूनही वैयक्तिक संबंध जपण्याची त्यांची पद्धत इथे दिसून आली.

**अतूट कौटुंबिक एकता :** कठीण काळात संपूर्ण कुटुंब (पवार आणि मोहिते-पाटील परिवार व इतर नातेवाईक) एका भिंतीसारखे एकमेकांच्या पाठीशी उभे राहिले. अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून कुटुंबाची एकजुट जगाला दिसली.

**प्रशासनाला सहकार्य:** एवढा मोठा जनसमुदाय उसळलेला असतानाही कुटुंबाने वारंवार शांततेचे आवाहन केले, जेणेकरून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही.

**कर्तव्याची जाणीव:** कुटुंबातील तरुण पिढीने (पार्थ, जय आणि इतर) स्वतः पुढाकार घेऊन येणाऱ्या लोकांची सोय आणि अंत्यविधीची व्यवस्था पाहिली, जे जबाबदारीचे भान दर्शवते.

**लोकांशी थेट संवाद:** अंत्यसंस्काराच्या ठिकाणीही कुटुंबातील सदस्य लोकांशी, विशेषतः सामान्य कार्यकर्त्यांशी हात जोडून संवाद साधत होते, ही त्यांची नम्रता आहे.

**परंपरेचा आदर:** हिंदू धर्मातील अंत्यसंस्काराच्या सर्व परंपरांचे त्यांनी काटेकोर पालन केले, तरीही त्यात कुठेही अंधश्रद्धा किंवा अवडंबर नव्हते.

**वसा आणि वारसा:** "माणसं कशी कमवावीत" हा शरद पवारांनी दिलेला मंत्र या कठीण प्रसंगी पुन्हा सिद्ध झाला. संपूर्ण महाराष्ट्र या कुटुंबाच्या दुःखात सहभागी होता, हे त्यांच्या दशकांच्या जनसेवेचे फलित आहे.

**पोरकेपण :** दादांच्या निधनाने संपूर्ण कार्यकर्त्यांच्या गराड्यात जाणवणारे एक अनामिक पोरकेपण.

**जनसागराचा लोंढा :** अंतिम दर्शनासाठी उसळलेला अथांग जनसागर, जणू अख्खा जिल्हा रस्त्यावर उतरला होता.

**कठोर काळजाचा माणूसही हेलावला :** दादांच्या जाण्याने नेहमी खंबीर दिसणारे नेते आणि कार्यकर्त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या.

**फुलांनी सजवलेला रथ :** पांढऱ्या शुभ्र फुलांनी सजवलेल्या रथातून दादांची काढण्यात आलेली अंतिम यात्रा.

**'अमर रहे'चा जयघोष :** 'दादा जोपर्यंत सूर्य-चंद्र राहतील, तोपर्यंत तुमचे नाव राहील' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

**अखेरची सलामी :** शासकीय इतमामात, पोलीस दलाने हवेत गोळ्या झाडून दिलेली मानवंदना.

**हृदयद्रावक क्षण :** पार्थिवाला मुखाग्नी देताना कुटुंबीयांच्या चेहऱ्यावरील असह्य वेदना आणि झालेला आक्रोश.

**गर्दीतील शांतता :** हजारो लोक असूनही, अंत्यसंस्काराच्या वेळी स्मशानभूमीत पसरलेली सुन्न करणारी शांतता.

**कार्यकर्त्यांचे हुंदके :** आपल्या लाडक्या नेत्याला कायमचे सोडून जाताना पाहून अनेक कार्यकर्त्यांनी मारलेले हुंदके.

**फुलांचा वर्षाव :** मार्गावरून जाताना ठिकठिकाणी घरांच्या गच्चीवरून आणि रस्त्यावरून झालेला फुलांचा वर्षाव.

**पक्षाची धुरा पोरकी :** पक्षाच्या झेंड्याखाली जमलेल्या कार्यकर्त्यांची झुकलेली मान आणि उदास चेहरे.

**अवतीभवतीच्या आठवणी :** उपस्थित प्रत्येक व्यक्तीच्या मुखी दादांनी केलेल्या मदतीच्या किंवा कामाच्या आठवणी.

**राजकीय नेत्यांची उपस्थिती :** पक्षभेद विसरून सर्वपक्षीय नेत्यांनी वाहिलेली आदरांजली.

**अग्नी देतानाचे दृश्य :** ज्वाळांमध्ये विलीन होणारे ते कर्तृत्ववान व्यक्तिमत्व पाहून सर्वांचे हात आपोआप जोडले गेले.

**पुष्पचक्र अर्पण :** मान्यवरांकडून पार्थिवावर अर्पण करण्यात आलेली असंख्य पुष्पचक्रं.

**घरातील सुतकी कळा :** दादांच्या निवासस्थानाबाहेरील शांतता आणि तिथे जमलेल्या महिलांच्या डोळ्यांतील पाणी.

**साधेपणाची प्रचिती :** अंत्यविधीच्या वेळीही दिसून आलेली त्यांची शिस्त आणि साधेपणाची परंपरा.

**सोशल मीडियावरील शोक :** लाखो लोकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिलेला 'डिजिटल' निरोप.

**राखेचा ढीग आणि आठवणी :** विधी पार पडल्यानंतर उरलेली ती राख आणि न संपणाऱ्या आठवणींची शिदोरी.


**एका पर्वाचा अंत :** सूर्यास्तासोबतच एका झंझावाती राजकीय आणि सामाजिक पर्वाचा झालेला अंत.












# शिरजगाव कसबा-करजगाव मार्गावर अवैध रेती वाहतूक; हायवा जप्त



**महासागर प्रतिनिधी**
**चांदुर बाजार, ( दि. 29 )** - शिरजगाव कसबा-करजगाव मार्गावर अवैधरीत्या रेती वाहतूक करणाऱ्या ट्रक डंपरवर महसूल प्रशासनाने कारवाई करून वाहन जप्त केले. ही कारवाई मंगळवारी (दि. 28 जानेवारी 2026) रात्री साडेआठ ते साडेनऊच्या सुमारास करण्यात आली.

## ‘हवेत विरलेली’ कारवाई; चर्चा मात्र वरिष्ठांपर्यंत ?

दि. 5 जानेवारी रोजी शिरजगाव कसबा येथील पाळा रस्त्यावर 4000 क्रमांक असलेला हायवा वाहन पकडण्यात आल्याची माहिती आहे. या कारवाईत तहसील कार्यालयातील एक वरिष्ठ अधिकारी, दोन तलाठी आणि दोन मंडळ अधिकारी सहभागी होते, अशी चर्चा आहे. मात्र त्या वाहनावर आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झालेली नसून ना दंड आकारण्यात आला आहे, ना ते वाहन अधिकृत नोंदीत दिसत आहे. त्यामुळे ही कारवाई ‘चिरीमिरी’ घेऊन हवेतच विरल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. या प्रकरणाची माहिती वरिष्ठ स्तरापर्यंत पोहोचल्याचे सांगण्यात येत असून, याबाबत लवकरच धक्कादायक निर्णय होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

ट्रक डंपर (हायवा) क्रमांक एमएच 27/ डीटी 2003 अवैध रेती वाहतूक करत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर माननीय तहसीलदार मनोज सोनारकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने शिरजगाव कसबा-करजगाव मार्गावर सापळा रचून कारवाई केली. संबंधित वाहन शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात आणून जप्तीनामा व पंचनामा करण्यात आला असून ते वाहन सुपुर्दगीवर जमा करण्यात आले आहे. या कारवाईत गौण खनिज पथकातील कविता नागले (मंडळ अधिकारी) यांच्यासह संजय चौधरी, पी. पी. डवरे, मनीष खलोकार, राहुल जोशी (ग्राम महसूल अधिकारी) तसेच सुमेध सोनाने (सहाय्यक महसूल अधिकारी) यांनी सहभाग घेतला. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात भविष्यातही कठोर कारवाई सुरूच राहील, असा इशारा महसूल प्रशासनाने दिला आहे.

# अतिदुर्गम टेंब्रु गावात संविधान तिरंगा रॅली

## देशभक्तीपर कार्यक्रमांनी साजरा झाला प्रजासत्ताक दिन

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.29 )** - मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील अतिदुर्गम व आदिवासीबहुल टेंब्रु गावात जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या वतीने 77 वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. संविधान तिरंगा रॅली, देशभक्तीपर घोषणा, कवायती, आदिवासी नृत्य व साक्षरतेची शपथ या उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर भारावून गेला.

विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा घेऊन ‘वंदे मातरम्’, ‘भारत माता की जय’, ‘भारतीय राज्यघटना जगात महान’ अशा गगनभेदी घोषणा देत रॅली काढली. इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी राजश्री सेलूकर हिने भारत मातेची आकर्षक वेशभूषा करून रॅलीचे नेतृत्व केले. या रॅलीमुळे पंचक्रोशीत देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.






रॅलीनंतर ध्वजारोहण करून राष्ट्रगीतापूर्वी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी साक्षर होण्याची शपथ घेत सामाजिक जागृतीचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांवरील कवायती व आदिवासी नृत्य हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले. मुख्याध्यापक महेश ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संजू चिमोटे, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, युवक व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# दहेंद्रीच्या अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत प्रजासत्ताक दिन

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.29 )** - अनुदानित आदिवासी आश्रमशाळा दहेंद्री येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलन आणि प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य, नाटिका, कवितावाचन तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. देशप्रेम, संविधानाची मूल्ये, सामाजिक एकोपा आणि आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर देशभक्तीमय वातावरणाने भारावून गेला होता.

वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमधील सुप्त कला गुणांना व्यासपीठ मिळाले. विशेषत: आदिवासी लोकनृत्य, पारंपरिक वेशभूषा आणि




लोकगीतांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. उपस्थित पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे भरभरून कौतुक केले.

या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी संविधानाचे महत्त्व, शिक्षणाचे मूल्य आणि राष्ट्र उभारणीत तरुणांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले. शेवटी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.




# न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये स्नेहसंमेलन, बक्षीस वितरण सोहळा

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि. 29 )**- न्यू इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व कर्तृत्वाला व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे, डॉ. प्रवीण चौधरी, डॉ. समता चौधरी, डॉ. कविता देशमुख, विलास पाटील, स्वीकृत नगरसेवक प्रवीण सावरकर, संजय खासबागे, योगेश ठाकरे व प्रा. घोरमाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्याध्यापक कोमल पांडव यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. विद्यार्थिनी अनम शहा हिने प्रभावी सूत्रसंचालन केले, तर प्रतिज्ञा बारस्कर हिने आभार प्रदर्शन केले. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य व गीतगायन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि अजितदादा जिव्हाळ्याचा ऋणानुबंध

*काही नाती कराराने जुळत नाहीत, ती स्वार्थाने टिकत नाहीत आणि पदांवर अवलंबूनही नसतात. ती नाती काळाच्या ओघात, विश्वासाच्या पायावर आणि माणुसकीच्या व्यवहारातून घडतात. अशीच एक नात्याची परंपरा म्हणजे अजितदादा पवार आणि डॉ. पंजाबराव देशमुख यांनी स्थापन केलेल्या श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती मधील ऋणानुबंध होता. श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे विद्यमान अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व पवार कुटुंबियांच्या नात्यातील ओलाव्याची झालर देखील त्याला होती.*

हा ऋणानुबंध औपचारिक नव्हता, पण खोल होता. तो प्रसिद्धीसाठी नव्हता, पण परिणामकारक होता. इतिहासाच्या पानांवर कदाचित तो मर्यादित शब्दांत नोंदला जाईल, मात्र श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वाटचालीत आणि असंख्य कार्यकर्त्यांच्या स्मरणात तो कायमस्वरूपी कोरला गेला आहे. भारताचे पहिले केंद्रीय कृषिमंत्री तथा शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांची श्री शिवाजी शिक्षण संस्था ही केवळ शैक्षणिक संस्था नव्हे; ती ग्रामीण महाराष्ट्राच्या आत्मसन्मानाची, सामाजिक उन्नतीची आणि शिक्षणाच्या लोकशाहीकरणाची चळवळ होती. या चळवळीच्या मूल्यांशी अजितदादांचे नाते केवळ राजकीय सोयीपुरते मर्यादित कधीच राहिले नाही. गरज पडेल तेव्हा संस्थेसाठी उभे राहणे, अडचणीच्या वेळी पाठिशी राहणे आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या भूमिकेला बळ देणे ही त्यांची सातत्यपूर्ण भूमिका होती.

विशेषत: डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती संपूर्ण महाराष्ट्रात शासकीय पातळीवर साजरी करण्यात यावी, यासाठी अजितदादांनी घेतलेला पुढाकार हा एका व्यक्तीचा सन्मान नव्हता, तर एका विचारपरंपरेला दिलेली मान्यता होती. शिक्षण, समाजोन्नती आणि ग्रामीण विकास या त्रिसूत्रीवर उभारलेल्या पंजाबरावांच्या कार्याला शासकीय प्रतिष्ठा मिळणे, हा अजितदादांच्या संवेदनशील आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचा ठसा होता.

अजितदादांबद्दल अनेक विशेषणे वापरली जात. ‘काम करणारा नेता’, ‘लोकांचे प्रश्न ऐकणारा मंत्री’, ‘थांबत नाही, थकत नाही असा माणूस’. ही विशेषणे ऐकून होतो; पण त्यांचा खरा अर्थ मला एका प्रसंगातून उमगला.

ज्यावेळी मी श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्यकारिणीचा सदस्य नव्हतो. राजकारणाशी माझा थेट संबंधही नव्हता. केवळ माझ्या डेंटल कॉलेजच्या कामानिमित्त मंत्रालयात गेलो होतो. मंत्रालयातील पायऱ्या चढत असताना एका मंत्र्यांच्या कार्यालयाबाहेर प्रचंड गर्दी दिसली. लांबच लांब रांग, चेहऱ्यावर आशा, डोळ्यांत अपेक्षा. क्षणभर प्रश्न पडला ही गर्दी नक्की कोणासाठी असेल? गर्दीत डोकावून पाहिले, तेव्हा लक्षात आले, ही गर्दी अजित पवारांची होती. तेव्हा ते



पाटबंधारे मंत्री होते. त्या दृश्यातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. नेतृत्व म्हणजे केवळ अधिकार नव्हे; नेतृत्व म्हणजे लोकांचा विश्वास असतो.

सर्वसामान्यासाठी मंत्रालयात दरवाजे उघडे ठेवणारा, सामान्य माणसाला वेळ देणारा, प्रश्न ऐकून घेणारा नेता म्हणजे अजितदादा अशी त्यांची ख्याती होती. राजकारणाच्या तळा-गाळा प्रवासात, अनेक चढ-उतारांतून जात असताना, लोकांसाठी काम करणे त्यांनी कधी सोडले नाही. म्हणूनच महाराष्ट्राने त्यांना सहा वेळा उपमुख्यमंत्री म्हणून स्वीकारले. हा केवळ पदाचा नव्हे, तर जनतेच्या विश्वासाचा सन्मान होता.

अजितदादांचे नेतृत्व वरून खाली लादलेले नव्हते; ते खालून वर घडलेले होते. सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचणे, त्यांच्या अडचणी ऐकणे, त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना ताकद देणे. यातून त्यांनी एक भक्कम कार्यकर्त्यांची फळी उभी केली. त्यामुळेच ते केवळ मंत्री नव्हते, तर कार्यकर्त्यांचे दादा होते.

2024 च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी व्यासपीठावर असताना माझा उल्लेख श्री शिवाजी शिक्षण संस्था कार्यकारिणी सदस्य असा करण्यात आला. त्या क्षणी अजितदादांनी माझ्याकडे कुतूहलाने पाहिले. तो एक साधा, पण अर्थपूर्ण क्षण होता. कधीही प्रत्यक्ष भेट न झालेल्या व्यक्तीबद्दल आपुलकी वाटणे, त्याच्या कामाविषयी जाणून घेण्याची उत्सुकता दाखवणे, हे मोठ्या कर्तृत्ववान व्यक्तीचेच लक्षण असते.

खरं तर एखाद्या व्यक्तीच्या कार्यामुळे आपल्यात आपोआप विश्वास निर्माण होतो, न भेटलेल्या माणसालाही आपण आधार मानतो, हे सहज घडत नाही. त्यासाठी त्या व्यक्तीच्या जीवनात सातत्य, प्रामाणिकपणा आणि लोकहिताची तळमळ असावी लागते. अजितदादा पवार हे त्या सगळ्यांचे मूर्तिमंत प्रतीक होते.

परंतु अजित दादा साठी बुधवार हा कालचा काळा दिवस उजाडला.

विमान अपघातात अजितदादांचे निधन झाल्याची बातमी आली. केवळ एक नेता हरपला असे नाही, तर लाखो लोकांचा आधार हरपला. हळूहळू संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. गावोगावी, शहराशहरात, घराघरात एकच भावना व्यक्त होत होती, अजितदादा परत या. त्यांच्या अंतिम संस्कारावेळी उसळलेल्या भावना, डोळ्यांतले अश्रू, घोषणांतून व्यक्त होणारी आर्त हाक, हे दृश्यच त्यांच्या कार्याची व्याप्ती सांगून जात होते. एखाद्या व्यक्तीचे आयुष्य किती लोकांच्या जीवनाशी जोडले गेले होते, हे अशा क्षणी स्पष्ट होते. अजितदादा पवार म्हणजे केवळ एक राजकीय व्यक्तिमत्त्व नव्हते. ते एक काळ होते. संघर्षाचा, निर्णयांचा, धाडसाचा आणि लोकांशी नातं जपणाऱ्या राजकारणातील दूरदृष्टी नेता होते. शिवाजी शिक्षण संस्था आणि अजितदादांमधील ऋणानुबंध हा त्या काळाचा एक महत्त्वाचा, जिवंत अध्याय आहे.

आज अजितदादा शारीरिक रूपात आपल्यात नाहीत; पण त्यांनी उभा केलेला विश्वास आणि त्यांनी रुजवलेली कार्यसंस्कृती ही कायम जिवंत राहील. इतिहास त्यांची नोंद घेईलच; पण महाराष्ट्राच्या मनात अजितदादा दादा म्हणूनच कायम राहतील.

**अजितदादा, तुम्ही परत या...**

ही केवळ घोषणा नाही, ती एका युगासाठी दिलेली भावनिक साद आहे. अजित दादांना माझ्या तर्फे, श्री शिवाजी शिक्षण संस्था व स्वर्गीय दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठान तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

**हेमंत वासुदेवराव काळमेघ**
**कार्यकारिणी सदस्य,**
**श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती**
**सचिव, स्वर्गीय दादासाहेब काळमेघ स्मृती प्रतिष्ठान सदस्य, स्थानिक व्यवस्थापन समिती, स्वर्गीय दादासाहेब काळमेघ स्मृती दंत महाविद्यालय व रुग्णालय**
**हिंगणा, जि. नागपूर 97666 32001**



# भक्ती, परंपरा आणि श्रद्धेचा महासंगम; बेंडोजी महाराजांच्या संजीवन समाधीला हजारोंचा लोट

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि. 29 )**- चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथे 13 व्या शतकातील थोर संत श्री संत बेंडोजी महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त सोमवारी (ता. 26) अभूतपूर्व भक्तिसागर उसळला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या लाखो भाविकांनी महाराजांच्या संजीवन समाधीचे श्रद्धेने दर्शन घेतले. सर्वत्र बेंडोजी महाराज की जयच्या गजराने घुईखेड नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली होती.

सोमवारी मोठ्या उत्साहात काल्याचे किर्तन व भव्यदिव्य दहिहांडी महोत्सव पार पडला. या सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. श्री संत बेंडोजी महाराजांच्या ऐतिहासिक पालखी सोहळ्यात संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या 182 दिंड्यांनी सहभाग घेतला. लेझीम, बँड, भजने व हरिनामाच्या गजराने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. सोहळ्यात सहभागी दिंड्यांमधून ईश्वरचिठ्ठीने सायंकाळच्या

## ‘बेंडोजी महाराज की जय’च्या गजरात न्हाऊन निघाली घुईखेड नगरी

## महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून 182 दिंड्यांची भक्तीमय उपस्थिती

## भक्तीला कलाविश्वाची सलामी; सोहळ्यात भारत गणेशपुरे-इल्लाक्रिती उपस्थित



महाआरतीचा मान संत गजानन महाराज महिला मंडळ, येरड बाजार दिंडीस मिळाला. यावेळी संबंधित दिंडीचा साळी-चोळी देऊन सन्मान करण्यात आला. 26 जानेवारी रोजी दुपारी 12 वाजता ह.भ.प. उमेश महाराज जाधव (आळंदीकर) यांचे काल्याचे किर्तन झाले. त्यानंतर दुपारी 4 वाजता बेंडोजी महाराजांच्या भव्य पालखी सोहळ्यास प्रारंभ झाला. घुईखेड येथील बेंडोजी बाबा विद्यालयाच्या दिंडीसह महिला व पुरुषांच्या 182 दिंड्या या सोहळ्यात सहभागी झाल्या होत्या. हरिनामाच्या जयघोषात ऐतिहासिक पालखी संस्थानच्या शेतामध्ये पोहोचली.

परंपरेनुसार शंभर वर्षांपूर्वीच्या चिंचेच्या झाडाजवळ दहिहांडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. सायंकाळी 7 वाजता महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. यावेळी महाआरती माजी आ. यशोमती ठाकुर यांच्या हस्ते पार पडली. तळेगाव दशासर पोलिसांनी संपूर्ण यात्रेत चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

या भक्तिमय सोहळ्यासाठी विशेष उपस्थिती म्हणून ‘चला हवा येऊ द्या’ फेम सुप्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे, फिल्म अभिनेत्री व दिग्दर्शक इल्लाक्रिती (शिवकमल फिल्म, मुंबई), खासदार अमर काळे, खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार यशोमती ठाकुर, वीरेंद्र जगताप, नगराध्यक्षा अर्चना रोठे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थानचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, विश्वस्त प्रविण घुईखेडकर, विश्वस्त मंडळ, गावकरी व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले. यात्रेनिमित्त भव्य खेळणी दुकाने व संसारोपयोगी साहित्याची दुकाने सजली होती. चांदूर रेल्वे बस आगाराने यात्रेकरूंसाठी जादा एसटी बसेसची व्यवस्था केली होती.






## भूमीशी आणि संत बेंडोजी महाराजांशी माझी भावनिक नाळ जुळलेली

चांदूर रेल्वे शहरातील नगर परिषद शाळेत माझे वर्ग 1 ते 4 चे शिक्षण झाले. त्यामुळे या भूमीशी आणि संत बेंडोजी महाराजांशी माझी भावनिक नाळ जुळलेली आहे. महाराजांच्या चरणी नतमस्तक होऊन एकच संदेश देतो की, जीवनात भक्ती ठेवा, माणुसकी जपा आणि आनंदी रहा असे मत प्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुर यांनी यावेळी व्यक्त केले. त्यांच्या आगमनाने दहीहंडीस्थळी एक वेगळाच चांगला माहोल तयार झाला होता.

**अभिनेते भारत गणेशपुरे**

## बेंडोजी महाराजांवर चित्रपट काढणार

संत बेंडोजी महाराजांची परंपरा, त्यांची भक्ती आणि ही अखंड श्रद्धा पाहून मन भारावून गेले. महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचावेत यासाठी भविष्यात बेंडोजी बाबांवर आधारित चित्रपट निर्माण करणार असल्याची माहिती अभिनेत्री इल्लाक्रिती (मुंबई) यांनी आपल्या भाषणातून दिली.

**अभिनेत्री इल्लाक्रिती**

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
**Group Editor-in-Chief and Managing Director**- Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**

# ईव्हीएम जनआंदोलनाची गरज

महानगर पालिकेच्या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाने नेत्र दीपक कामगिरी केली त्याबद्दल अभिनंदन केले पाहिजे. नगरपरिषद, नगरपंचायत या पाठोपाठ महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये महाराष्ट्रातील जनतेने भाजपा व त्यांच्या मित्र पक्षांना भरभरून मते दिली.

२९ महानगरपालिका निवडणुकापैकी जवळपास २४ महानगरपालिकांमध्ये भाजपाची व त्यांच्या मित्र पक्षाची सत्ता येणार एवढे प्रचंड बहुमत सत्ताधारी पक्षाच्या आघाडीला मिळालेले आहे. भूतकाळाचा विचार केल्यास भूतकाळात कधीही कोणत्याही पक्षाला मिळाले नाही ते यश भाजपाला मिळाले आहे.

ही अभिनंदनीय बाब असली तरी अनेक नागरिकांच्या मनात ईव्हीएम मशीनवर रोष असल्याचे दिसून आले आहे. ईव्हीएम मशीन कायमची बंद करा अशी मागणी करणाऱ्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे सामान्य माणसाचा विश्वास ईव्हीएम मशीन वर राहिलेला नाही. अशा परिस्थित आज निर्माण झाली आहे.

महानगरपालिकेच्या निवडणुकांमध्ये ईव्हीएम मशिनने कहर केला. मोठ्या गडबडी समोर आल्या. नाशिक जिल्ह्यातील गिरीश गणेश शिरवाडकर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली ती प्रतिक्रिया अतिशय बोलकी आहे.

त्यांनी नाशिक मधील महानगरपालिकेत मतदान केले. मत धनुष्यबाणाला दिले. मात्र लाईट कमळाचा लागला. काहीतरी गोंधळ झालेला आहे म्हणून त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे तक्रार केली. मात्र तुमचं काहीही निष्पन्न झाले नाही तर तुमच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल व तुम्हाला जेलमध्ये टाकण्यात येईल अशी धमदाटी गिरीश शिरवाडकर यांना करण्यात आली. हा संपूर्ण प्रकार चीड आणणारा आहे.

भारतासारख्या प्रचंड मोठ्या लोकशाही देशात हा प्रकार लोकांचे मत हिरावून घेणार आहे. प्रशासन झालेली चूक लक्षात न घेता सामान्य माणसांना जेलमध्ये टाकण्याची धमकी देत आहे. हा प्रकार विचित्र आहे. सामान्य माणसांनी न्याय कुणाकडे मागायच्या असा प्रश्न भारतीय नागरिक विचारीत आहे. लोकशाहीत लोकांची हक्क व अधिकार हिरावून घेतले जात असतील तर देश हुकूमशाहीकडे वाटचाल करत आहे असे समजायचे काय?

नगरपंचायत आणि महानगरपालिका मध्ये ईव्हीएमबाबत अनेक तक्रार केल्या गेल्या. मात्र प्रत्येक प्रकरणात प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही. जळगाव महानगरपालिकेत एका अपक्ष उमेदवाराला शून्य मत मिळाले. त्याचा स्वतःचे मतसुद्धा त्याला मिळाले नाही. त्याचे स्वतःचे मत गेले कुणाकडे असा प्रश्न विचारल्यानंतर निवडणूक आयोगाचे यावर उत्तर आले नाही.

एकंदरीत ईव्हीएम मशीनवर जनतेचा आता विश्वास राहिलेला नाही. मागे एकदा मध्य प्रदेशातील भिंड जिल्ह्यातील अटेरमध्ये अशीच गडबड झाली होती. कोणालाही मतदान केले तर ते भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारालाच मत मिळायचे ही वास्तविकता लक्षात आल्यानंतर अधिकाऱ्यावर कारवाई केल्या गेली होती. देशातील अनेक राज्यात असे प्रकार घडलेले आहेत.

भारताने लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारलेली आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची राज्यघटना लिहून काढली. यासाठी त्यांनी अपार कष्ट केले अहोरात्र मेहनत केली. राज्यघटनेत एका माणसाला एक मत हा अधिकार दिला. गरीब श्रीमंत असा भेद न करता सर्वांना मतदानाचा अधिकार मिळवून देण्याचे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. मात्र सध्याची राजकीय परिस्थिती पाहू जाता नागरिकांच्या मताधिकाराचे काय होईल असा प्रश्न निर्माण झाला आहे.

भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनी २००९ मध्ये एश्ट ला विरोध केला होता. ईव्हीएम मशीन भारतीय लोकशाहीसाठी हानिकारक असल्याचे लालकृष्ण अडवाणी यांनी म्हटलेले होते. इतर विरोधी पक्षांनी सुद्धा ईव्हीएम मशीन बंद करून बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी केली होती.



नितीन कैलासराव गोहने
रा. हिरापूर ता. सावली
जि. चंद्रपूर.
8275393387

मायावती यांनी ईव्हीएम मशीनवर बंदी घालण्याची मागणी केली होती. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ईव्हीएम मशीन बंद करून बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची विनंती निवडणूक आयोगाला केली. अनेक राजकीय नेत्यांनी ईव्हीएमला विरोध दर्शवला असताना निवडणूक आयोग बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यास पुढे का येत नाही असा प्रश्न राजकीय विश्लेषका सोबतच सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झाला आहे.

जगात १९५ देश आहेत. या देशांपैकी पुढारलेल्या देशांमध्ये निवडणुकांमध्ये ईव्हीएम चा वापर केला जात नाही. अमेरिका जगातला तंत्रज्ञानामध्ये पुढारलेला देश आहे. मात्र या देशात ईव्हीएमचा वापर केला जात नाही.

इटलीत ईव्हीएम मुळे निवडणुका प्रभावित होत असल्याचं कारण देत मशीन बंद केल्या, इंग्लंड व फ्रान्स या देशातही ईव्हीएमचा वापर केला जात नाही. नेदरलँड, जर्मनी या देशात एश्ट वर बंदी घालण्यात आली. मोठी सुरक्षा प्रणाली वापरलेल्या अनेक संगणकामधला डेटा हॅक केला जाऊ शकतो तर ईव्हीएमबाबत तस नक्कीच होऊ शकतो असे अनेक शास्त्रज्ञाने म्हटलं आहे.

अमेरिकेतील बिझनेसमॅन एलोन मस्क यांनी ईव्हीएम हॅक केल्या जाऊ शकतं असे विधान केले होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ईव्हीएम मशीनद्वारे निवडणुका घेण्याबाबत विरोध दर्शवला होता. नेदरलँड मध्ये २००६ मध्ये एश्ट मशीन वर बंदी घालण्यात आली होती. २००९ मध्ये जर्मनीमध्ये एश्ट बंदी घालण्यात आली होती. जेवढे पुढारलेली राष्ट्र आहेत त्या देशातील निवडणुका या बॅलेट पेपरवर घेतल्या जात आहेत.

लोकांचा रोष एश्ट मशीनवर आहे. हा रोष जनतेचा आहे. नुकतेच १६ जानेवारीपासून धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांनी ईव्हीएम मशीन बंद झाल्या पाहिजे म्हणून उपोषणाचा मार्ग स्वीकारला.

मात्र त्यांच्या उपोषणाला निवडणूक आयोगाने पाहिजे तसा प्रतिसाद दिला नाही. शेवटी टायर जाळून निषेध आंदोलन करावे लागले. लोकांना आता रस्त्यावर उतरवून ईव्हीएम विरोधात आंदोलन करण्याची आवश्यकता आहे.

२०१३ मध्ये अण्णा हजारे यांनी लोकपाल विधेयकासाठी दिल्लीत आंदोलन केले होते. परिणाम असा झाला की काँग्रेसची तेव्हापासून पिछेहाट झाली. अण्णा हजारे आज झोपलेले आहेत. ईव्हीएम विरोधात त्यांनी आंदोलन करावे अशी लोकांची मागणी आहे. मात्र अण्णा हजारेंना जाग येईल याची मुळीच शक्यता नाही.

गडबड, धांदली व मतदाराचे आकडे न जुडणे या साऱ्या गोष्टी लोकशाही शासन व्यवस्थेसाठी हानिकारक आहेत. तंत्रज्ञान पुढे जात असले तरी गडबड करण्याचे मार्ग उपलब्ध आहेत. सामान्य नागरिक, राजकीय पक्ष यांनी ईव्हीएम विरोधातील आपली धार अधिक तीव्र करण्याची गरज आहे.

या ठिकाणी महत्त्वाचा मुद्दा असा की भारतीय जनता पार्टी हा आशिया खंडातील सर्वात मोठा पक्ष आहे. जवळपास २३ राज्यात या पक्षाची सत्ता आहे प्रत्येक निवडणुकांमध्ये भाजपा निवडून येत आहे. भाजपाचा जनाधर वाढत जात आहे. विरोधी पक्षांचे आव्हान संपुष्टात येत आहेत. त्यामुळे भारतीय जनता पक्षाने स्वतः पुढाकार घेऊन बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याबाबत आग्रही भूमिका घ्यावी अशी अपेक्षा आहे.

कर्नाटक सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बॅलेट पेपर वर घेण्यासंबंधाने निर्णय घेतलेला आहे. इतर राज्यांनी बॅलेट पेपर निवडणुका घेण्यासंबंधी निर्णय घ्यावा अशी अपेक्षा आहे. निकोप लोकशाहीच्या भविष्यासाठी बॅलेट पेपर वर निवडणुका घ्याव्यात अशी रास्त अपेक्षा आहे अन्यथा जनआंदोलनाची गरज आहे.

# स्वरांची साधना आणि संयमाची उंची

## सुमन कल्याणपूर



२८ जानेवारी १९३७ रोजी बांगलादेशातील ढाका येथे जन्मलेल्या सुमन कल्याणपूर (माहेरचे नाव सुमन हेमाडी) यांचा प्रवास हा केवळ यशाचा नाही, तर संयम, साधेपणा आणि आत्मविश्वासाचा आहे.

वडील शंकरराव हेमाडी सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये वरिष्ठ पदावर असल्याने बदलीनिमित्त कुटुंब मुंबईत स्थायिक झाले आणि याच महानगरीत सुमनजींच्या कलाप्रवासाला खऱ्या अर्थाने दिशा मिळाली.

सुरुवातीला चित्रकलेची ओढ असली तरी, निसर्गदत्त स्वरांनी त्यांना संगीताच्या वाटेवर आणले. पंडित लक्ष्मणराव अमृते यांच्याकडे त्यांनी शास्त्रीय संगीताचे संस्कार घेतले. हीच शिस्त आणि साधना पुढे त्यांच्या गायकीची ओळख ठरली. १९५४ मध्ये दरवाजा या चित्रपटातून पार्श्वगायनाची सुरुवात झाली आणि एक नवा, कोवळा पण ठसठशीत स्वर हिंदी चित्रपटसृष्टीत उमटला.



प्रमोद जांभुळकर
नागपूर.
९८२३९६९०९७

लता मंगेशकर यांच्या स्वराशी साधर्म्य असल्याने काहींनी त्यांना दुसरी लता असे लेबल लावले. पण सुमनजींनी कधीही अस्वस्थता, कटुता किंवा स्पर्धेची भावना बाळगली नाही. उलट, त्यांनी स्वतःच्या गुणवत्तेवर आणि मेहनतीवर विश्वास ठेवत शांतपणे आपली वाट चालत राहिली.

१९६० च्या दशकात मिळालेल्या संधींचा त्यांनी पुरेपूर उपयोग केला. ह्यआजकल तेरे मेरे प्यार के चर्चे, ना ना करते प्यार तुम्ही से कर बैठे, ठहिये जाईये ही हिंदी गाणी असोत किंवा केतकीच्या वनी तिथे, रेशमाच्या रेघांनी ही मराठी अजरामर रचना–त्यांच्या आवाजाने रसिकांच्या मनात कायमचे घर केले.

त्या काळातील रेकॉर्डिंग प्रक्रिया आजच्या डिजिटल युगापेक्षा कितीतरी कठीण होती. ५०-६० वाद्यवृंद, एकाच टेकमध्ये परिपूर्ण गायन आणि किंचितशी चूक झाली तरी पुन्हा सुरुवात–या सगळ्यात त्यांची शिस्त आणि एकाग्रता प्रकर्षाने दिसून येते.

विवाहानंतरही त्यांनी गायनात खंड पडू दिला नाही. चित्रपटसृष्टीतील राजकारण, लॉबिंग आणि अन्याय यांचा फटका बसूनही त्यांनी कधी जाहीर तक्रार केली नाही; मौन आणि काम हीच त्यांची उत्तरे होती.

प्रसिद्धीच्या शिखरावर असतानाही पाय जमिनीवर ठेवण्याचे मूल्य त्यांनी जपले. त्यांच्या योगदानाची दखल घेत भारत सरकारने त्यांना ह्यपद्मभूषणह्न सन्मानाने गौरवले. मात्र पुरस्कारापेक्षा मोठा सन्मान म्हणजे त्यांच्या स्वरांवर प्रेम करणारा श्रोता–जो आजही त्यांच्या गाण्यांतून भावनांचा अनुभव घेतो.

सुमन कल्याणपूर यांचे आयुष्य आपल्याला शिकवते की, मोठ्या व्यक्तींच्या सावलीतही स्वतःची ओळख निर्माण करता येते–तीही शांतपणे, संयमाने आणि गुणवत्तेवर निष्ठा ठेवून. आजच्या तीव्र स्पर्धेच्या काळात त्यांचा संयम, साधेपणा आणि स्वरातील पारदर्शकता हे केवळ संगीतप्रेमींनाच नव्हे, तर प्रत्येक क्षेत्रातील माणसाला प्रेरणा देणारे आहे.

# अगं अगं सुनबाई...
# खिळवून ठेवण्यात अपयशी

मिराज टॉकीज चंद्रपूर येथे हा चित्रपट कुटूंबासह पाहण्यात आला. चित्रपटाची प्रसिध्दी सोशल मिडीयातून आणि झी मराठी वाहिनीव्दारे व्यवस्थितपणे सुरू आहे. पत्रकार परिषदेतून चित्रपटाची भुमिका व्यवस्थित मांडली गेली आहे. प्रसिध्दीसाठी ते आवश्यकही आहे.

या चित्रपटाचे संपुर्ण कथानक निर्मिती सावंत आणि प्रार्थना बेहरे यांच्याच भोवती फिरते आहे. राजन भिसे आणि नकुल घाणेकर यांची भुमिका मध्यांतरापुर्वीची आहे. सासू (निर्मिती सावंत) आणि सुन (प्रार्थना बेहरे) ची भुमिका ही मध्यांतरापुर्वी विळ्या भोपळ्याचीच दाखवली गेली आहे.



मिलिंद गड्डमवार
(मुक्त पत्रकार)
राजुरा जि. चंद्रपूर.
9511215200

नवऱ्याच्या मृत्युनंतर समाजात त्यांच्या अर्धांगणीची काय अवस्था होते? यावर प्रकाश टाकला गेला आहे. तसेच समाजातील? कोत्या मनोवृत्तीवर प्रहार केला आहे. ही चित्रपटाची चांगली बाजू आहे. एका यशस्वी पुरूषाच्या मागे एक स्त्री उभी राहू शकते. तर मग एका अभागी स्त्री च्या मागे तिची सासू कां उभी राहू शकत नाही? या थीम (गृहतका) भोवती चित्रपट फिरतो आहे. या चित्रपटाची कहाणी ही प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी नाही.

मध्यंतराआधीच वडील आणि मुलाचा अंत एका होर्डींगच्या अपघाताने झालेला दाखविला गेला आहे. या धक्यातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी निर्मिती सावंत आणि मनस्वी (प्रार्थना बेहरे) यांनी केलेली धडपड ही पडद्यावर पहाण्यासारखी आहे. नवऱ्याच्या मृत्यूपश्चात प्रार्थना बेहरेला दिवस गेल्याचे कळल्याने निर्मिती सावंत आणि प्रार्थना बेहरे यांच्या मनातील घालमेल कौटुंबिक जीवनातील अंतरंग उलगडणारी आहे.

होर्डींग धारकाला धडा शिकविण्याचा विचार प्रार्थना बेहरे च्या मनाचा ठाव घेणारा आहे. तीला यासाठी तीच्या सासूची आणि वकीलाची मदत मीळते.बलाढ्य व्यक्तीला कोर्टात खेचण्याचा विचार हा कौटुंबीक दृष्ट्या किती त्रासदायक ठरणारा असतो याचे चित्रणं क्लेशदायक आहे.

या चित्रपटामधील सर्वच जुनी गाणी (जसे- निंबोणीच्या झाडाखाली चंद्र झोपला गं बाई ! इ.) ही प्रसंगावर आधारित आणि परिचयाची असल्याने चित्रपटातील आनंद व्दिगुणीत झाला आहे. चित्रपट रटाळ होण्यापासून वाचला आहे. या संपूर्ण चित्रपटात स्वतःचे एकही गीत कथा लेखकाला, दिग्दर्शकाला टाकावेसे वाटले नाही याचे नवलं वाटते आहे. यामुळे या चित्रपटात गीतकाराचे, संगीत दिग्दर्शकाचे काही कामच पडलेले नाही असे जाणवते आहे.

कमी बजेटचा हा मराठी चित्रपट असावा अशी खात्री यातून पटते आहे. सासू आणि सून यांना एकाच धाग्यात(दोघांचाही नवरा व मुलं गेलेले दाखवून) बांधण्यासाठीची केलेली धडपड ही आपत्तीजनक वाटते आहे. जेंव्हा की याची काहीही गरज नव्हती.

विदर्भातील दोन सहनिर्माते प्रकाश पाटील मारकवार, मुल आणि डॉ. अशोक जीवतोडे, चंद्रपूर यांनी चित्रपटाची निर्मिती दिग्दर्शक केदार शिंदे यांच्या नेतृत्वात केल्याचा आनंद आणि अभिमान आम्हा चंद्रपूर वासियांना नक्कीच आहे. चित्रपटाचा शेवट कोर्टाच्या निर्णयाने झाला आहे. यात न्यायाधिशाची छोटीशी भुमिका प्रकाश पाटील मारकवार यांनी स्वतः निभावलेली आहे. कोर्टाचा निर्णय हा निर्मिती सावंत आणि प्रार्थना बेहरे या कुटुंबियांच्या विरोधात गेला आहे. जेंव्हा की त्यांच्या संघर्षाला न्याय मिळणे अपेक्षित होते.

न्यायालयातील युक्तीवाद हा चित्रपटात विस्ताराने दाखविला गेला असता तर अनेक बाबींचा उलगडा हा करता आला असता. तो न्याय आणि तर्कसंगत ठरला असता. या निर्णयाला आव्हान वरीष्ठ कोर्टात देण्याचे निमित्त साधून घाईगडबडीत या सिनेमाचा शेवट केला गेला आहे. याची खंत मनाला कुठेतरी खटकते आहे.

# जीवनदायिनी रेखा!

(मागच्या अंकावरून)

----------------

रेखाच्या दृढनिश्चयी भूमिकेमुळे भ्रष्टाचाराची भाषा बदलत माणूसकीचे नवे पर्व सुरु होऊन सदाचाराची नवी भाषा येथे बोलल्या जाऊ लागली.

एके सायंकाळी घरी आल्यावर रेखाने प्रश्न विचारले. त्या दोन माडियाचे काम झाले का ? ते दोघे अजूनही झाडाखाली बसून आहेत. त्यावर खोब्रागडे उत्तरले, कोण ? मला भेटले नाहीत आणि माहितही नाही. अवतीभवती, बाहेर अधूनमधून नजर टाकली पाहिजे. म्हणजे काय चाललं आहे ते लक्षात येईल. ऑफिसात आलेल्यांना वाट बघावी लागणार नाही.

रेखाच्या या बोलण्यात क्रांतीप्रसवधार होती. लेखकाने चूक कबूल करीत तात्काळ क्लार्कला बोलावून सर्व प्रक्रिया पूर्ण करुन त्यांचे काम केले. रेखा हा सर्व प्रकार पाहत होत्या. म्हणाल्या, हे कालच व्हायला पाहिजे होते. मी तिला सॉरी म्हणालो, असे लेखक लिहितात तेव्हा त्यांना घट्ट मिठी मारावीशी वाटते. दिवाळीचा दिवस होता.

रेखाने त्या दोन माडियांना घरी बोलावत त्यांचा पाहुणचार केला. त्यांना सन्मानपूर्वक जेवायला बसवून लाडू, वरण-भात, भाजी-पोळी त्यांच्या ताटात वाढले. ते संकोचले होते. रेखा शिपायाला म्हणाली, ह्यआम्ही आत जातो, त्यांना पोटभर जेवायला द्या.ह्व लाडू हातात घेऊन ते गोल फिरवत होते. कधीही न पाहिलेले पदार्थ त्या दोन माडीयाने पहिल्यांदा खाल्ले होते. त्यांच्या चेह ?यावरील आनंद पाहून रेखाही आनंदली, हे लिहिताना लेखक रेखाप्रती आदरपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतात.

डॉ. महेंद्रकुमार एम. मेश्राम
२४, राजगृह, शंभूनगर,
कोराडी रोड, नागपूर.
९९७५६६५८६२

इ. झेड यांच्या सभोवताल वावरणारी अदृष्य यंत्रणा म्हणजेच रेखा, कोणताही शाब्दिक शृंगार न करता लेखकाने आपल्या अनुभवातून जसेच्या तसे रेखाटली आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत सुंदर व अप्रतिम आहे. हे पुस्तक अनेकांच्या वाटा समृद्ध, प्रशस्त व जीवनप्रवाही करणारे असून पती-पत्नीच्या नात्याचे संविधान आहे.

■ ■ ■

# विदर्भाच्या विकासासाठी रेल्वेकडून मोठ्या अपेक्षा

विदर्भाच्या विकासात रेल्वेची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. देशाच्या मध्यभागी असलेले नागपूर आजही अधिक चांगल्या रेल्वे सुविधांच्या प्रतीक्षेत आहे. नागपूरमध्ये स्वतंत्र रेल्वे झोनची स्थापना ही विदर्भातील प्रमुख मागणी असून, त्यामुळे स्थानिक प्रकल्पांना प्राधान्य व बजेटमध्ये वाढ होणे शक्य होईल, असे मत व्यक्त होत आहे.

नागपूरहून मुंबई, पुणे, दिल्ली, हैदराबाद, विशाखापट्टणम, छत्रपती संभाजीनगर व बेंगळुरू येथे अतिरिक्त वेगवान व थेट रेल्वेगाड्या सुरू करण्याची गरज आहे. विशेषतः नागपूर - छत्रपती संभाजीनगर दरम्यान थेट रेल्वेगाडीची मागणी दीर्घकाळापासून प्रलंबित आहे.

तसेच मोतीबाग येथील नॅरोगेज सुविधांच्या जागी वंदे भारत कोचच्या देखभाल व दुरुस्तीची व्यवस्था उभारावी, अशी मागणी होत आहे. यामुळे



डॉ. प्रवीण डबली
माजी सदस्य
झेडआरयुसीसी
दपूम रेल्वे, नागपूर.
९४२२१२५६५६

नागपूरहून अधिक वंदे भारत गाड्या सुरू करणे शक्य होईल. त्याचप्रमाणे नागपूर - पुणे स्लीपर वंदे भारत सुरू करण्याचीही मागणी आहे. अद्याप ब्रॉडगेज वंदे भारत (ब्रॉडगेज मेट्रो) सुरू झालेली नसून, ती तातडीने सुरू करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यासोबतच रेल्वे स्थानकांचा वर्ल्ड-क्लास पुनर्विकास, स्वच्छ शौचालये, लिफ्ट, डिजिटल माहिती प्रणाली तसेच मेट्रो व बस सेवांशी उत्तम समन्वय अशा मूलभूत सुविधांवरही भर देण्यात येत आहे.

नवीन रेल्वे मार्ग, चौथी लाईन प्रकल्प आणि मालवाहतूक टर्मिनलमुळे शेतकरी व उद्योगांना मोठा लाभ होईल, अशी अपेक्षा आहे. आगामी रेल्वे बजेटकडून विदर्भाला विकासाच्या नव्या पटरीवर नेणाऱ्या ठोस निर्णयांची जनतेला प्रतीक्षा आहे.

■ ■ ■

# मदर ऑफ ऑल डील्स

वाचक लिहितात

26 जानेवारी 2026 या दिवशी झालेल्या प्रजासत्ताक दिन सोहळ्याला युरोपियन युनियनचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा आणि युरोपीय आयोगाच्या अध्यक्षा उर्सूला डेर लेयेन विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. ह्या सोहळ्यात भारताची संस्कृती, समृद्धी आणि सामर्थ्य याचे दर्शन झाले.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी म्हणजे 27 जानेवारीला 19 वर्षे प्रलंबित असलेला भारत आणि युरोपियन युनियन यांच्यामध्ये मुक्त व्यापार करार करण्यात आला. हा करार म्हणजे सर्व करारांची जननी आहे असे भाष्य पंतप्रधान मोदी यांनी केले. हा करार म्हणजे जगातील दोन प्रमुख अर्थव्यवस्था मधील समन्वयाचे अद्भुत उदाहरण आहे.

हा करार जागतिक जीडीपीच्या अंदाजे 25% आणि जागतिक व्यापाराच्या अनुमाने एक तृतीयांश भागाचे प्रतिनिधित्व करतो. ह्या करारामुळे भारतातील उत्पादन वाढेल आणि देशातील सेवा आणि संबंधित क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास सहाय्य होईल.

27 विकसित देशांच्या या महासंघाशी होणारा हा करार भारताच्या जागतिक व्यापाराची दिशा पालटणारा ठरू शकतो. या कराराचा सर्वात मोठा लाभ भारताच्या निर्यात क्षेत्राला होणार आहे.

कापड, रत्ने, दागिने, चर्म उद्योग आणि कृषी उत्पादने या क्षेत्रांना शून्य शुल्कात प्रवेश मिळाल्यास लाखो नवीन नोकऱ्यांची निर्मिती होईल. औषध निर्मिती क्षेत्रासाठी ही कडक नियम शिथिल झाल्यास भारतीय जेनेरिक औषधांना मोठी बाजारपेठ मिळेल.

या करारामुळे जागतिक व्यवसाय आणि गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास आणखीन दृढ होईल त्याचबरोबर जागतिक पुरवठा साखळींना आणखीन बळकटी येईल.

कोणताही देश केवळ संरक्षण क्षेत्रात मोठा असून चालत नाही किंवा कोणताही देश केवळ आर्थिक क्षेत्रात मोठा असून चालत नाही तर या दोन्ही क्षेत्रात तो बलवान असणे आवश्यक आहे.अमेरिका याच गोष्टीमुळे जगावर दादागिरी करत आहे. चीनने हीच नीती अवलंबली आहे. भारतही हीच नीती वापरून पुढे जात आहे त्यामुळे अमेरिकेच्या महासत्तेला आव्हान ठरू लागले आहे. हे सहन होत नसल्याने अमेरिका येन केन प्रकरणेन भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करत आहे. भारताच्या कुशल नेतृत्वामुळे आणि धोरणामुळे अमेरिका अर्थात ट्रम्प यांचा उद्देश सफल होताना दिसत नाही.

पूर्वीच्या तुलनेत आज भारत अधिक प्रमाणात विदेशातील देशांशी व्यापार करू लागला आहे परिणामी सकल राष्ट्रीय उत्पादनातही वाढ झालेली आहे. संरक्षण आणि आर्थिक क्षेत्रात बलवान झाल्यास भारत महासत्ता होऊ शकतो हे लक्षात घेऊनच प्रयत्न करणे आवश्यक आहे.

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.

# ‘दादा’ पर्व संपले

बुधवार २८ जानेवारीची सकाळ महाराष्ट्रासाठी सकाळ न ठरता काळ रात्र ठरली कारण या सकाळी महाराष्ट्राच्या राजकारणातील धडाडीचा लोकनेता उपमुख्यमंत्री अजित पवार काळाच्या पडद्याआड गेले. बुधवारी सकाळी ९ वाजता टीव्हीवर बातम्या पाहत असताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात ही ब्रेकिंग न्यूज ऐकली आणि काळजाचा ठोका चुकला. अजित पवार हे या अपघातातून सहिसलामत वाचावेत अशी प्रार्थना करत असतानाच अजित पवारांच्या निधनाची बातमी टीव्हीवर झळकली आणि मन सुन्न झाले.

या बातमीने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली ही बातमी खोटी निघावी अशी अनेकजण प्रार्थना करत होते पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. दादा आपल्यात नव्हते. क्षणात होत्याचे नव्हते झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला. कार्यकर्ते, नेते, तरुण, वृद्ध, महिला सगळ्यांच्याच अश्रुंचा बांध फुटला.

दादा म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणातील एक वादळ होते. चार दशकांहून अधिक काळ आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणावर ठसा उमटवणारा हा वाघ नागरिकांना कायमचा सोडून जरी गेला असला तरी आपल्या कार्याने त्यांनी नागरिकांच्या मनावर जो ठसा उमटवला तो कधीही निघून जाणार नाही.

दादा म्हणजे कामाचा माणूस. दादाकडे गेले की काम होणारच असा विश्वास लोकांना असायचा. काम होण्यायोग्य असेल तर लगेच करणारा आणि होण्यायोग्य नसेल तर तोंडावर नाही म्हणणारा. पोटात एक आणि ओठात एक असे राजकारणी दादा नव्हते जे पोटात आहे तेच बोलणारा आणि तेच करणारा. कडक शिस्तीचा पण तितकाच दिलदार मनाचा. मिश्किल, सुस्वभावी मनात येईल ते पटकन बोलून टाकणारा.

बोलताना कशाचीही तमा न बाळगणारा पण आपण बोलल्याने कोणाचे मन दुखावले गेले हे लक्षात येताच जाहीर दिलगिरी व्यक्त करणारा आणि त्यासाठी जाहीर प्रायश्चित घेणारा, स्वतः वेळेचे बंधन पाळणारा आणि इतरांना वेळेचे महत्व पटवून देणारा. तरुणांना निर्व्यवसनी राहण्याचा सल्ला देणारा, चुकीला चूक आणि बरोबर असेल तर बरोबर म्हणणारा, कार्यकर्ता असो की नेता, स्वपक्षातील असो की विरोधातील चुकीचे वागत असेल तर त्याला वडिलकीच्या नात्याने खडसावणारा आणि त्याच नात्याने त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा, सतत सत्तेत राहूनही विरोधी पक्षांशी मैत्रीचे संबंध जपणारा, सकाळी सहा वाजता कामाला सुरुवात करणारा आणि ते काम दर्जेदार व्हावे असा हट्ट धरणारा, केवळ आणि केवळ महाराष्ट्राचा विकास हेच डोक्यात असणारा आणि त्यासाठी दिवसाचा रात्र करणारा.....





श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

भाजप, शिवसेनेसारख्या हिंदुत्ववादी पक्षाशी हातमिळवणी करून सत्ता स्थापन करणारा तरीही शिव, शाहू, फुले आंबेडकरांचा पुरोगामी विचार न सोडणारा, त्या विचारांशीच एकनिष्ठ राहणारा, कुटुंब आणि राजकारण यांची योग्य सांगड घालणारा, कुटुंबात राजकारण आणि राजकारणात कुटुंब येऊ न देणारा दादा म्हणजे राजकारणातील वेगळेच रसायन होते. प्रत्येक गाव खेड्यातील कार्यकर्त्याला दादा म्हणजे आपला नेता वाटत होता.

जवळपास चार दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या दादांच्या राजकीय जीवनाची सुरुवात १९८१-८२ साली छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून झाली. भारतीय राजकारणातले द्रष्टे नेते काका शरद पवार यांनी त्यांच्यातील नेतृत्व गुण हेरून त्यांना राजकारणात आणले.

१९९१ साली आपल्या नेतृत्व गुणाची चुणूक दाखवून दादांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सत्तांतर घडवून आणले. त्याच वर्षी सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यावर देखील आपले वर्चस्व मिळवले.

दादांच्या नेतृत्व गुणाची पारख झाल्याने १९९१ साली शरद पवारांनी दादांना थेट खासदारकीची संधी दिली. खासदार म्हणून मोठ्या मताधिक्याने जिंकून आलेल्या दादांनी काकांसाठीच खासदारकीचा राजीनामा देऊन बारामतीत आमदारकी लढवली तेव्हापासून कामाच्या आणि लोकसंपर्काच्या जोरावर दादा बारामती तालुक्यातून सलग आठ वेळा विक्रमी मतांनी आमदार म्हणून निवडून आले.

१९९१ साली पहिल्यांदाच आमदार झालेल्या दादांना सुधाकरराव नाईक यांनी आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि कृषी, फलोत्पादन आणि ऊर्जा खात्याचे राज्यमंत्रीपद दिले. १९९९ नंतर त्यांनी ग्रामविकास, पाणीपुरवठा, स्वच्छता ही मंत्रिपदे सांभाळी. जलसंपदा हे खातेही २०१० पर्यंत त्यांच्याकडेच होते. अर्थमंत्री म्हणून तर त्यांनी विक्रम केला. महाराष्ट्राचे अर्थमंत्रिपद त्यांनी सर्वाधिक काळ भूषवले. दादांनी सहा वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याचा विक्रम केला.

दरम्यानच्या काळात त्यांच्या गळ्यात विरोधी पक्षनेत्याची माळही पडली. १९९९ साली शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केल्यावर राष्ट्रवादी पक्ष आणि घड्याळ चिन्ह घरोघरी पोहचवण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. शरद पवार दिल्लीचे राजकारण करत असल्याने महाराष्ट्रातील राष्ट्रवादीची धुरा त्यांच्याच खांद्यावर होती. त्यांच्यामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसला कायम सत्तेत राहता आले. दादांची जशी राजकारणार पकड होती तशीच पकड त्यांची कला, क्रीडा, साहित्य, सहकार, शिक्षण, जलसिंचन या क्षेत्रावर देखील होती. प्रत्येक क्षेत्राचा बारकाईने अभ्यास करून त्यात सर्वोत्तम देणारा अजित पवारांसारखा दुसरा नेता नाही.

त्यांचा इतका कामाचा झपाटा असणारा नेता पुन्हा होणार नाही. अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. त्यांचा सारखा नेता पुन्हा होणार नाही. त्यांच्या निधनाने राजकारणातील ' दादा' पर्व संपले असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. धडाडीचे लोकनेते असणारे सर्वांचे लाडके अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### उत्तिर्ण व्हायचे ना?

अपयशातील अपला
करुन टाका बाद
परिक्षेत यश मिळेल
भौ तुम्हाला
निर्विवाद ..!

अ-अभ्यासात
ठेवा सातत्य
प- परिश्रम करण्याची
हवी जिद्द
हळुहळू अप चा
होईल लोप
पडेल पदरी यश
ही ठेवा होप!

नको फेसबुक,
कॉलेज कट्टा
वाचन चिंतन
निरंतर करा घरी
टेंशन मुक्त
व्हाल खरोखरी
यशाचे बनालच
मानकरी ..!



■ **बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारप्रसंगी आवर्जून उपस्थित असलेले केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. दिवंगत अजित पवार यांचे पुत्र जय आणि पार्थ पवार यांनाही त्यांनी सांत्वना दिली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते प्रफुल पटेल यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री करा

## मंत्री नरहरी झिरवळ यांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २९ :**



अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारे वक्तव्य समोर आले आहे. राष्ट्रवादीचे नेते नरहरी झिरवळ यांनी थेट सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्याची मागणी करत अजित पवार यांच्या पश्चात निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. झिरवळ यांच्या या विधानानंतर राज्याच्या राजकारणात आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या हालचालींना वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

नरहरी झिरवळ यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, अजित पवार यांच्यानंतर सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्यात यावे. झिरवळ यांच्या या मागणीने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी पक्षाने तातडीने निर्णय घ्यावा, असा संकेत या विधानातून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अंत्यसंस्काराच्या दिवशीच अशी मागणी समोर आल्यामुळे तिचे राजकीय महत्त्व अधिक वाढले आहे.

पवार कुटुंबीय हे कायमच राजकारणात प्रॅक्टिकल आणि दूरदृष्टीने विचार करणारे मानले गेले आहेत. एका बाजूला अजित पवार यांच्या जाण्याचे दुःख असले, तरी दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणतीही निर्नायकी अवस्था निर्माण होऊ नये, यासाठी हालचाली सुरू झाल्याचे चित्र आहे. झिरवळ यांच्या मागणीमागेही हाच राजकीय व्यवहार्यतेचा विचार असल्याचे बोलले जात आहे.

अजित पवार यांच्या अंत्यविधीत दिसलेली मांडणी आणि त्यानंतर लगेच सुनेत्रा पवार यांच्या नावाची चर्चा, या सर्व घटनांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या भविष्यातील नेतृत्वाबाबत संकेत दिले आहेत. पक्षात नेतृत्वाची धुरा कुणाकडे जाणार, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होण्याची शक्यता आहे.



■ **बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दादांच्या पत्नी श्रीमती सुनेत्राताई पवार यांची भेट घेत सांत्वन केले.

# झेडपी आणि पंचायत समिती निवडणुकांच्या तारखांमध्ये बदल

## ७ फेब्रुवारीला मतदान तर ९ तारखेला होणार मतमोजणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे 12 जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या 125 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून 5 फेब्रुवारी 2026 ऐवजी आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी मतदान, तर 7 फेब्रुवारी 2026 ऐवजी 9 फेब्रुवारी 2026 रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी 13 जानेवारी 2026 रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी 31 जानेवारी 2026 च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे. परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे 28 जानेवारी 2026 रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात 28 जानेवारी 2026 ते 30 जानेवारी 2026 पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे.

या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना 31 जानेवारी 2026 रोजी प्रसिद्ध करतील. आता 7 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती 5 फेब्रुवारी 2026 रोजी रात्री 10 वाजता होईल. संबंधित ठिकाणी 9 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी 10 वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात 11 फेब्रुवारी 2026 पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

# विमान अपघाताची चौकशी सुरू



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २९ :**
महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मुंबईहून बारामतीच्या विमानतळावर लँड करत असतानाच त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह विमानातील सर्वांचाच मृत्यू झाला आहे. आता हा अपघात नेमका कशामुळे झाला, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आता याची चौकशी एएआयबी या संस्थेने सुरू केली असल्याची माहिती समोर आली आहे.

विमान अपघात तपास ब्यूरो या संस्थेने अपघाताची चौकशी सुरू केली असून त्याचा अहवाल आल्यानंतर तो राज्य सरकारलाही पाठवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताची चौकशी करावी असे पत्र केंद्रीय उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना लिहिले होते. त्या पार्श्वभूमीवर या अपघाताची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

फडणवीस यांनी दिलेल्या पत्रावर प्रतिक्रिया देताना मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांनी म्हटले की, विमान अपघात ब्यूरो या संस्थेने तपास सुरू केला आहे. विमानातील ब्लॅकबॉक्स ताब्यात घेण्यात आला आहे. विमान अपघात आणि घटना नियमांनुसार, तपास सुरू केला आहे. तो पारदर्शी आणि कालबद्ध पद्धतीने होईल.

या अपघातातील सर्व टेक्निकल रेकॉर्ड्स, ऑपरेशनल तपशील, घटनास्थळावरील तथ्य याचा तपास केला जात आहे. भविष्यात अशा घटना होऊ नयेत, या आपल्या विनंतीची मंत्रालयाने दखल घेतली असून, चौकशी अहवाल येताच त्यादृष्टीने उपाययोजना करण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

पान ४ वरून....

### महाराष्ट्रावर आर्थिक संकट...

राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचाही आर्थिक ताण वाढत चालला आहे. लाडकी बहीण योजनेसाठीच सुमारे ३६,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एकीकडे अशा योजनांद्वारे सामाजिक सुरक्षितता देणे आणि दुसरीकडे राज्याचा विकास दर, जो सध्या सुमारे ९ टक्के अपेक्षित आहे, टिकवून ठेवणे हे आर्थिक संतुलन अजित पवार अत्यंत कौशल्याने साधत होते. नव्या नेतृत्वाकडे जर हे संतुलन साधण्याची क्षमता नसेल, तर राज्याला विकासकामांसाठी आणखी कर्ज घेण्याशिवाय पर्याय उरणार नाही.

एकूण आर्थिक स्थिती पाहता, २०२५-२६ या वर्षासाठी महाराष्ट्राचा एकूण अर्थसंकल्प ७,२०,०२० कोटींचा आहे, महसुली तूट ४५,८९१ कोटी इतकी आहे, राज्यावरील एकूण कर्ज ९.३ लाख कोटींच्या आसपास पोहोचले आहे, तर नुकत्याच दावोस २०२६ परिषदेत सुमारे १४.५ लाख कोटींच्या गुंतवणूक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. या गुंतवणुकीतून पुढील एका वर्षात सुमारे १५ लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. माझ्या धमार्बाद सारख्या गावात गेल्या दोन दिवसापासून मिरचीचे मार्केट बंद आहे येथून मंदीची सुरुवात आहे. नांदेडमध्ये प्रताप पाटील चिखलकर पोरके झालेत येथून मंदीची सुरुवात आहे.

अजित पवारांच्या जाण्याने तात्काळ आर्थिक मंदी येईलच असे नाही, मात्र प्रशासकीय मंदी येण्याची शक्यता नक्कीच दाट आहे. दावोस येथे झालेल्या करारांचे प्रत्यक्ष गुंतवणुकीत रूपांतर, मोठ्या प्रकल्पांची वेळेत अंमलबजावणी आणि वित्तीय शिस्त कायम ठेवण्यासाठी अजित पवारांसारख्या निर्णयक्षम आणि काटेकोर प्रशासकाची उणीव प्रकर्षाने जाणवणार आहे. ही पोकळी कोण आणि किती वेगाने भरून काढतो, यावरच महाराष्ट्राच्या आर्थिक भवितव्याची दिशा ठरणार आहे.

**(लेखक महाराष्ट्र भूषण, पत्रकार आणि ज्येष्ठ आर्थिक विश्लेषक आहेत.)**

# वडेट्टीवार समर्थक नगरसेवकांच्या अपहरणाचा प्रयत्न

## ट्रॅव्हल्स अडवून शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २९ :**
चंद्रपूर महापालिकेत सत्तास्थापनेवरून काँग्रेस विधिमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार व खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे. नगरसेवकांच्या पळवापळवीनंतर आता नगरसेवकांची बस रस्त्यात अडवून अपहरणाचा प्रयत्न, हाणामारी व जिवे मारण्याची धमकी देण्यापर्यंत हा वाद पोहोचला आहे.

याप्रकरणी वर्धा जिल्ह्यातील सावंगी मेघे पोलीस ठाण्यात धानोरकर गटाचे सौरभ ठोंबरे तथा अन्य पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. धानोरकर यांचे कट्टर समर्थक सोहेल शेख यांचेही नाव पोलीस तक्रारीत आले आहे. सोहेल शेख व ठोंबरे महापालिका निवडणुकीतील काँग्रेसचे पराभूत उमेदवार आहेत.

धानोरकर यांचे समर्थक आहेत. धानोरकर गटातील चार ते पाच नगरसेवक वडेट्टीवार गटात सहभागी झाले आहेत. वडेट्टीवार गटाचे सर्व नगरसेवक पुणे येथे सहकुटुंब पर्यटनाला गेले होते. नगरसेवक गुरुवारी पहाटे समृद्धी महामार्गाने नागपूर येथे खासगी बसने परत येत असताना पाच ते सहा वाहनांनी त्यांची वाट रोखून अपहरणाचा प्रयत्न केला.

# दादांच्या केबिनमधील माणुसकी आता कोठे शोधायची?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.२९ :**
ज्यांच्या एका शब्दावर मंत्रालयाचे सहा मजले हादरून निघायचे, ज्यांच्या कडक शिस्तीने बड्या सनदी अधिकाऱ्यांचाही घाम सुटायचा, त्या अजित पवार यांच्या निधनाने आज केवळ त्यांचे कार्यकर्तेच नव्हे, तर त्यांच्या केबिनबाहेर दिवसरात्र तैनात असलेले कर्मचारीही सुन्न झाले आहेत. 'दादा' म्हणजे केवळ सत्तेचे केंद्र नव्हते, तर ते या कर्मचाऱ्यांच्या आयुष्यातील 'टाईम मॅनेजमेंट' आणि 'शिस्तीचे' चालतेबोलते विद्यापीठ होते.




आयटी इंजिनिअर आलम शेख यांच्यासाठी दादांसोबतचे काम म्हणजे एक विलक्षण अनुभव होता. ते सांगतात, सकाळी आठची मीटिंग म्हणजे दादा पावणे आठलाच हजर! बैठकीच्या टेबलवर पाण्याची बाटली कोणत्या कोनात ठेवली आहे, इथपासून त्यांचं बारीक लक्ष असायचं.

प्रशासनाचा इतका गाढा व्यासंग होता की, एखाद्या फाईलवर त्यांनी वर्षापूर्वी काय सही केली होती, हे त्यांना अचूक आठवायचं. ऑफिसमध्ये कागदाचा कपटा दिसला तरी ते स्वतः उचलायचे आणि मग संबंधित कर्मचाऱ्याची शाळा घ्यायचे. त्यांच्या जाण्याने एक उत्तम प्रशासक आम्ही गमावला आहे.

गेल्या सहा वर्षांपासून दादांकडे टंकलेखक म्हणून काम करणारे जगदीश कुलकर्णी सांगतात, दादा लोकांसाठी राजा होते. सामान्य नेत्यांसारखे ते फक्त आश्वासन देऊन थांबायचे नाहीत, तर लोकांचे काम पूर्ण होईपर्यंत त्याचा पाठपुरावा करायचे. कामाचा कितीही ताण असला, तरी छोट्या कर्मचाऱ्याला कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी दादा पालकासारखी घ्यायचे.

**दादा नावाचा 'बाप' माणूस हरवलाय!**

२००८ पासून दादांच्या कार्यालयात टेलिफोन ऑपरेटर म्हणून काम करणारे निळकंठ पवार यांच्या शब्दांतून दादांच्या माणुसकीचे दर्शन घडते. ते म्हणतात, दादांचा वक्तशीरपणा आणि जरब अख्ख्या महाराष्ट्राला माहिती आहे. पण त्या जरबेच्या मागे एक अत्यंत हळवं आणि काळजी घेणारं मन होतं.

आज कार्यकर्ते टाहो फोडत आहेत की 'दादा परत या', पण हे आता निसगार्ला मान्य नाही. राजकारणात कोण येईल आणि जाईल, पण आमच्यासाठी 'दादा' नावाचा जो बापमाणूस हरवलाय, त्याची पोकळी कधीच भरून येणार नाही.

**शिस्तीचा अध्याय मिटला!**

मंत्रालयातील ए-४ बंगला असो किंवा उपमुख्यमंत्री कार्यालय, दादांच्या उपस्थितीने तिथे नेहमीच एक वेगळी ऊर्जा असायची. अधिकाऱ्यांची पूर्ण तयारीनिशी येण्याची धडधड आणि कर्मचाऱ्यांची तत्परता आता एका शांततेत रूपांतरित झाली आहे. दादांच्या त्या पहाटेच्या बैठका, अर्जावर पडणारा तो खणखणीत शेरा आणि चुकल्यास मिळणारा तो प्रेमळ ओरडा आता केवळ आठवणींच्या पानांवर उरला आहे.

# दादांना आदरांजली

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर / मुंबई, दि. २९ :**

अजित पवार यांच्या अपघाती निधनाबद्दल देशभरातील नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आदरांजली वाहिली आहे.



महाराष्ट्रातील बारामती येथे झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ५ लोकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अकाली निधन हे कधीही भरून न येणारे नुकसान आहे.अजित पवार हे महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः सहकार क्षेत्रात दिलेल्या विशेष योगदानाबद्दल नेहमीच लक्षात राहतील. मी त्यांच्या कुटुंबियांना, समर्थकांना आणि चाहत्यांना माझ्या मनापासून संवेदना व्यक्त करते. या अपघातात जीव गमावलेल्या इतर सर्वांच्या कुटुंबियांना हा धक्का सहन करण्याची शक्ती देवो.

**राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु**



आम्ही आमचा नेता गमावला. त्यांना परत बघता येणार नाही. हे कधीही न भरून निघणारे दुःख आहे. त्यांनी नेहमीच आम्हा सगळ्यांना पाठबळ दिले, आधार दिला. चांगले काम केले तर प्रशंसा करायचे. थोड्या कुठे चुका झाल्या तर हक्काने वडिलांसारखे ओरडायचे, मार्गदर्शन करायचे. एक दिवस असा गेला नाही की, दादांचे नाव तोंडातून निघाले नसेल. आम्ही यापुढे काम करत असताना प्रत्येक बाबतीत त्यांची आठवण येत राहील.

सगळ्या बाजूने दादांनी केलेल्या कामांचे कौतुक होत आहे. महाराष्ट्राने काय गमावले याबाबत सर्व बोलत आहेत आणि ते ऐकायला आज दादा नाहीत. त्यांनी नेहमीच भरभरुन प्रेम दिले. वडिलांचे जसे मार्गदर्शन मिळत आले, तसे त्यांचेही नेहमी मिळत आले. ते प्रोत्साहन देत राहिले. नेहमी तरुणांना, महिलांना, युवतींना संधी मिळाली पाहिजे, नवे नेतृत्व घडले पाहिजे हेच त्यांचे नेहमी असायचे. सभागृह हे आधीसारखे नसेल. आमच्या सगळ्यांचे आयुष्य सुद्धा त्यांच्याविना आधीसारखे नसरणार आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया अदिती तटकरे यांनी दिली आहे.

**अदिती तटकरे, मंत्री**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अचानक झालेल्या अपघाताने महाराष्ट्राचे मन हेलावून गेले आहे. राज्य आणि समाजासाठी निस्वार्थपणे कार्य करणारे एक प्रभावी नेतृत्व अजित पवार आपल्यातून निघून गेले, ही अत्यंत वेदनादायी घटना आहे. त्यांचे राज्याच्या जडणघडणीत मोठे योगदान राहिले आहे. प्रशासकीय पातळीवर कार्य करण्याची त्यांची हातोटी अतुलनीय होती. त्यांच्या कायार्चा आणि योगदानाचा ठसा सदैव स्मरणात राहील. त्यांच्या विचारांने, कर्तृत्वाने आणि सेवाभावाने पुढील पिढ्यांना सतत प्रेरणा मिळत राहील.

**राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनावर काँग्रेस नेते नितीन राऊत यांनी संशय व्यक्त करत गंभीर प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि तांत्रिक तपासणी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. विमान कोणत्या कंपनीचे होते त्याच्या तांत्रिक बाबी तपासल्या आहेत का हे बघणे गरजेचे आहे. ही घटना घातपात आहे की अपघात याचा शोध लागला पाहिजे. ही घटना अत्यंत दुःखद असून त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी आहोत.

**डॉ. नितीन राऊत**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक, दुदैर्वी आणि दुःखद आहे. अजित पवार हे महाराष्ट्राचे दमदार नेते होते. त्यांना काम करण्याचा फार मोठा अनुभव होता. प्रशासनावर पकड होती.

विधिमंडळात १२ वर्ष सोबत काम करताना अतिशय जवळचा संबध होता, दिलेला शब्द पाळणारा नेता अशी त्यांची ख्याती होती. विकासात्मक दृष्टिकोन व लोकांना जोडणारा नेता होता. महाराष्ट्राच्या विकासामध्ये त्यांचा मोठा सहभाग आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी झटणाऱ्या लोकनेता अजित पवार यांच्या अकाली निधनाने केवळ महाराष्ट्राचीच नव्हे तर देशाची कधीही भरुन निघनारी हानी झाली आहे. ही पोकळी कधीच भरुन निघणार नाही.

**माजी खासदार रामदास तडस**



महाराष्ट्र हा पुरोगामी विचारांचा गड आहे आणि या गडाचा एक खंबीर बुरुज आज कोसळला आहे. रिपब्लिकन चळवळीबद्दल पवार यांच्या मनात नेहमीच आपुलकी होती. त्यांच्यासारखा संयमी आणि कामाप्रती निष्ठावान, सर्वसामान्यांची कामे करणारा नेता अचानक निघून जाणे, संपूर्ण राज्याची मोठी हानी आहे. मी माझ्या पक्षातर्फे आणि वैयक्तिकरित्या त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

**केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनावर भाजप खासदार उज्वल निकम यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. अजितदादा महाराष्ट्राचे लाडके होते आणि आपला शब्द पाळणाऱ्यांपैकी ते होते. जुन्या आठवणींना उजाळा देताना ते म्हणतात की एकदा माझ्या कारचा अपघात झाला असताना त्यांनी फोन करून काळजी व्यक्त केली. बाहेरून जरी ते कठोर दिसत असले तरी तेवढेच संवेदनशील होते.

**खासदार ॲड. उज्वल निकम**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाण्याने आमचा आधार देणारा नेता हरवला आहे. पवार कुटुंबीयांनी दिलेल्या प्रेमाची आठवण काढत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अनिल पाटील म्हणाले की भविष्यकालीन वाटचालीसाठी दिशाहीन झालो आहोत. अजित पवार यांनी आम्हा सर्व आमदारांच्या मतदारसंघात अनेक विकासकामे केली. आमचे खूप मोठे नुकसान झाले आहे. आमचे अस्तित्व संपल्यासारखे वाटत आहे.

**आमदार अनिल पाटील**



दादा त्यांच्या अंतर्ज्ञानं आणि अभ्यासपूर्ण प्रतिसादांसाठी ओळखले जात होते. प्रशासनावर मजबूत पकड असलेले, सहा दशकांहून अधिक काळ सार्वजनिक जीवनात सक्रिय असलेले, सहा वेळा उपमुख्यमंत्री म्हणून काम केलेले आणि नेहमीच प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देणारे दादा आपण गमावलेले आहे. अजित दादा यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणात एक कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

**नितीन भुतडा**